**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/११८/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक २१ एप्रिल २००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री.रणजीत नामदेव चव्हाण<br>मु.पिंपरखेड, तालूका- आष्टी<br>जिल्हा-बीड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालूका कृषी अधिकारी, आष्टी<br>जिल्हा-बीड. | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषी अधिकारी, आष्टी<br>जिल्हा-बीड. | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २१-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनाावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. रणजीत नामदेव चव्हाण (येथून पुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, आष्टी, श्री.माणीक सखाराम त्र्यंबके ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत. तथापि अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कृषी, आष्टी ( येथून पुढे त्यांना अपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. जनअपिलिय अधिकारी हे दुस-यांदा आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहीले आहेत. याची आयोगाने सखेद नोंद घेतली असून अपिलिय

अधिकारी यांच्या या वर्तनाची नोंद सचिव, जलसंधारण व कृषी मंत्रालय मुंबई यांनी घ्यावी अशी आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.या प्रकरणी कृषी विभागातर्फे सहसंचालक (कृषी) श्री. हणुमंत चंद्रप्पा कोराळकर, हे हजर होते.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- ३१-१०-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"मौजे. बोरोली येथील सिमेंट बंधा-या बाबत व शेतकरी मेळावे, पिक प्रात्यक्षीके इत्यादी बाबत माहिती मागविली होती.

१) सिमेंट बंधा-याचे इस्टिमेटची प्रत.

२) काम सुरु झाल्याचा व पुर्ण झाल्याचा दिनांक

३) कामावरील मजुर व कारागीरांची नावे पत्ता इ.

४) काम रो.ह.यो. अंतर्गत असल्यास हजेरी पत्रकाच्या प्रति.

५) पिक प्रात्यक्षीकांचा संपुर्ण तपशिल.

६) बियाणे व खते यांच्या वाटपाचा संपुर्ण तपशील.

७) खरिपातील शेतकरी मेळाव्याचा संपुर्ण तपशिल."

अपिलार्थीने वरील माहिती जानेवारी २००६ ते ३१ ऑक्टोंबर, २००६ पर्यंतच्या कालावधीची व व्यक्तीशः अपेक्षीली होती.

वरील माहिती वरुन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक-३ मधील इत्यादी माहिती काय अभिप्रेत आहे, हे विचारले असता अपिलार्थी त्यांचा खुलासा करु शकले नाहीत. तसेच मुद्दा क्रमांक-५,६ व ७ मध्ये त्यांनी तपशिल म्हणून नेमकी काय माहिती हवी आहे याचा त्यांनी वरील अर्जात उल्लेख केलेला नाही. तथापि संबंधित लाभधारकांची यादी, पीक प्रात्यक्षिका करिता नेमका कशा करिता व

किती खर्च आला, शेतकरी मेळाव्यास कोण हजर होते. त्या मेळाव्या करिता कोण कोणत्या बाबींवर किती खर्च आला. याची माहिती त्यांना हवी आहे. असे त्यांच्या प्रतिपादनावरुन दिसून आले.

अपिलार्थीचे वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक- ०९-१२-२००६ रोजी उत्तर दिले. त्या उत्तरामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती मंडळ कृषी अधिकारी, धानोरा यांच्याकडे प्रलंबित आहे व त्यांना आपणास सदर माहिती सादर करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे नमूद केले आहे व पुढे सदर माहिती आवश्यक ते शुल्क भरुन घेवून जावी असा उल्लेख आहे. सदर माहिती देण्यापोटी येणा-या खर्चाची कोणतीहि कल्पना या दिनांक- ०९-१२-२००६ रोजीच्या पत्रात दिली नाही. तव्दतच ही माहिती कोठून घेवून जावी, याच्या तपशीलाचा जनमाहिती अधिकारी यांनी या पत्रात उल्लेख केलेला नाही.

वरील माहिती अपिलार्थीस आज दिनांक- २१-०४-२००७ पर्यंत मिळाली नसल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये आज सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांनी एकूणच सकारात्मक प्रतिसाद न दिलेल्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील १९ (१) कलमातील तरतुदी प्रमाणे प्रथम अपिल केले असून त्या अपिलामध्ये त्यांची मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे. प्रथम अपिलाची सुनावणी न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०५-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिलातहि अपिलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज आयोगा समोर झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक- ३१-१०-२००६ रोजी केलेल्या अर्जातील माहिती अपिलार्थीस दिनांक- ३०-११-२००६ पर्यंत माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये देणे अभिप्रेत आहे. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे सिध्द होत आहे. त्यांचे

म्हणण्या प्रमाणे त्यांनी मंडळ अधिकारी धानोरा यांच्याकडून दिनांक- ०९-१२-२००६ रोजी अपिलार्थीस वरील अर्जा संदर्भात माहिती मागविली होती. त्याच बरोबर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जा संदर्भात प्रथमतः उत्तर दिनांक- ०९-१२-२००६ रोजी देवून अप्रत्यक्षपणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याचेच नव्हे तर माहिती देण्या संदर्भात प्रथम कार्यवाही देखिल विहित मुदतीपेक्षा जास्त विलंबनाने केल्याचे सिध्द करुन दिले आहे. त्याच बरोबर या प्रकरणी जनअपिलिय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल करुनही त्या अपिलाची आजपर्यंत कोणतीही दखल घेतली नाही. हे अपिलिय अधिकारी यांचे वर्तन त्यांच्यामधील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करते.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याचे कारण काय आहे, याची जनमाहिती अधिकारी यांना पृच्छा केली असता त्यांनीही माहिती मंडळ कृषी अधिकारी, धानोरा यांच्याकडून वेळेत प्राप्त न झाल्यामूळे त्यांनाअपिलार्थीस ही माहिती वेळेत पुरविता आली नाही. तथापि अपिलार्थीस सदर माहिती कार्यालयीन वेळेत घेऊन जाण्याचे त्यांचे कडील दिनांक- ३०-१२-२००६ चे पत्रान्वये कळविले असल्याचे त्यांनी पुढे प्रतिपादन केले. त्याच बरोबर अपिलार्थीस दिनांक- ३०-१२-२००६ रोजीचे पत्र मिळाले नसल्याचे अपिलार्थीने आयोगा समोर सांगितले आहे. सदर पत्र साध्या पोष्टाने पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले. जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक- ३०-१२-२००६ रोजीचे पत्राचा क्रमांक ,ताकृअ/आ/माअ/३२६३/०६, असा आहे. सदर पत्राची नोंद आवक जावक रजिष्टरला आहे, असे जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावाणी मध्ये सांगितले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ३०-१२-२००६ रोजी माहिती देण्यासाठी तयारी दर्शविली आहे. हे जरी ग्राहय धरले तरी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याची तयारी देखिल तीस दिवस इतका उशिराने झाल्याचे सिध्द होत आहे. सबब जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदा २००५मधील कलम २० (१) अनुसार २५०/-रुपये प्रतिदिन प्रमाणे ७,५००/- रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

या प्रकरणाच्या सुनावणीसाठी अपिलिय अधिकारी हे आयोगा समोर दुस-यांदा सतत गैरहजर राहीले. दोन्हीहि वेळेस सुनावणीसाठी गैरहजर राहून अपिलिय अधिकारी यांनी कर्तव्यपरायणता दाखविली नाही, हे सिध्द होते, त्यांच्या विरुध्द योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करण्यास ते पात्र ठरतात. तव्दतच जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास केलेला विलंब तसेच माहिती अधिकार २००५ बद्दल दाखविलेला अनादर लक्षात घेता, जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्या बाबत सचिव, कृषी, मंत्रालय, मुंबई यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ३०-१२-२००६ रोजी पाठविलेल्या पत्राची शहानिशा संचालक (कृषी) यांच्या कार्यालयाने करावी.( या प्रमाणे हजर सहसंचालक (कृषी) यांना सूचित करण्यात आले आहे.) तव्दतच अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती स्पष्ट स्वरुपात अपिलार्थीस हे आदेश पारीत झाल्या पासून तीन दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी पुरवावी, असे आदेशीत करण्यात येत आहे. अपिलार्थीचे मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक- ५,६,७, चे संदर्भात अपिलार्थी यांनी तालूका कृषी अधिकारी, आष्टी यांच्या कार्यालयात जावून उशिरात उशिरा दिनांक- २४-०४-२००७ पूर्वी हजर राहून ही माहिती व्यक्तीश: प्राप्त करुन घ्यावी.

या प्रकरणात अपिलार्थीने नस्ती पहाण्यासाठी उपलब्ध करुन देण्या विषयी लेखी विनंती केल्यास त्यांना ती वरील मुदतीत तात्काळ उपलब्ध करुन द्यावी. सर्वसाधारणपणे आयोगाच्या सुनावणी मध्ये कृषी विभागातील ब-याचशा अधिका-यांना माहिती अधिकार २००५ मधील तरतुदी व त्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात पुरेशे प्रशिक्षण मिळाले नसल्याचे दिसून येत आहे. सचिव, जलसंधारण व कृषी यांनी त्यांचेकडील क्षेत्रीय अधिका-यांना माहिती अधिकारी कायदा २००५ मधील तरतूद व अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत.असे या बरोबर आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायद्यातील कलम २० (१) नुसार प्रतिदिन २५०/- रुपये प्रमाणे ७,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द सचिव (कृषी)/ सचिव ( जलसंधारण) यांनी महाराष्ट्र नागरी सेवा १९७९ अन्वये यथा योग्य प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी व तीन महिन्यात आयोगास अहवाल सादर करावा.

४. सचिव,(जलसंधारण) व सचिव (कृषी) यांनी त्यांचेकडील क्षेत्रीय अधिका-यांना माहिती अधिकारी कायदा २००५ मधील तरतूद व अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद
दिनांक २१ एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

<u>प्रत-</u>

१. श्री.रणजीत नामदेव चव्हाण, मु.पिंपरखेडा, पो. हिवरा, तालूका- आष्टी, जिल्हा-बीड.
२. जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, आष्टी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, आष्टी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. सहसंचालक, जलसंधारण व कृषी, कृषी संचालनालय, पुणे यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
५. सचिव, (जलसंधारण) व सचिव (कृषी) मंत्रालय, मुंबई यांना वरील यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी व उचित कार्यवाहीसाठी त्यांनी त्यांचा अनुपालन अहवाल तीन महिन्यात आयोगा कडे पाठवावा.
६. श्री.दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
७. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/६७/रामाआ/औ'बाद-**
निर्णय दिनांक- ०२ एप्रिल, २००७.

१. श्री.मधुकर लक्ष्मण आप्पा चेटप, आखाडा बाळापूर, तालूका-कळमनुरी जिल्हा-हिंगोली. **-- अपिलकर्ता.**

विरुध्द

**१.** जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,कळमनुरी. **--उत्तरवादी.**

२. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,हिंगोली.

## -विवेचन-

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०२ एप्रिल, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.मधुकर लक्ष्मण आप्पा चेटप, (या पुढे अर्जदार म्हणून उल्लेख केला जाईल.), जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी (या पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून उल्लेख केला जाईल.) श्री. डि. व्ही.पवार हे हजर आहेत. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली (या पुढे अपिलिय अधिकारी म्हणून उल्लेख केला जाईल.) हे गैरहजर आहेत. उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली कडील पत्र जा.क्र.२००७/ अपील/

सिआर-६७, दिनांक- ३०-०३-२००७ अन्वये श्री.जी.एल.जाधव, अव्वल कारकुन यांना सुनावणीसाठी पाठविण्यात आले असून ते आयोगा समोर उपस्थित झाले आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अर्जदार यांनी दिनांक- २६-१२-२००५ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" शहरातील किरकोळ विक्रेत्यांची संपूर्ण नांवाची यादी व तालुक्यातील घाऊक, अर्धघाऊक यांची संपूर्ण नावपट्टी यादी व दुकानाचे नाव व मालकाचे नाव. "

सदर माहिती अजर्दाराने व्यक्तीशः अपेक्षिली असून अर्जामध्ये अर्जदाराने कोणताही विशीष्ट कालावधी नमूद केलेला नाही.

अर्जदाराने अर्जावर जरी २६-१२-२००५ अशी तारीख दाखविली असली तरी तो अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- ०२-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते व तसे त्यांनी शपथपत्रावर कबुल केले आहे. अर्जदारास दिनांक- ०२-०२-२००६ रोजीच्या अर्जावर त्यास प्रथम जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०६-०२-२००६ रोजी सदर माहिती देण्यापोटी येणारा खर्च म्हणून रुपये १२/- इतके शुल्क शासकीय तिजोरीत भरणा करणे विषयी कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये दाखविलेले पत्र पाहून सदर पत्र पाठविल्याचा दिनांक- ०३-०१-२००६ असा नमूद केला आहे. तथापि ही तारीख चुकून पडली आहे, असे जनमाहिती अधिकारी हे सुनावणीमध्ये शपथपूर्वक सांगत आहेत.

यानंतर अर्जदाराने सदर रक्कम भरल्यानंतर अर्जदारास दिनांक- २७-०२-२००६ रोजी सदर माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

यानंतर अर्जदाराने याच माहितीच्या संदर्भात दिनांक- १३-०२-२००६ रोजी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले. अर्जदाराने या अपिलामध्ये जनअपिलीय अधिकारी यांच्या नांवाचा उल्लेख केला आहे. ते नांव सौ.स्वाती सुर्यवंशी नरवाडे असे आहे. आजच्या सुनावणीमध्ये सदर अधिकारी हया तेथे तहसीलदार म्हणून त्यावेळी कार्यरत होत्या. असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्जदाराने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये हे अपिल उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांच्याकडे करावयास हवे होते व त्या प्रमाणे त्यांनी तहसील कार्यालय, कळमनूरी यांनी दिनांक- १७-०३-२००६ रोजी कळविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. यानंतर अर्जदाराने उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपिल न करता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ३१-०३-२००६ रोजी सरळ व्दितीय अपिल केले आहे. अर्जदाराने या व्दितीय अपिलामध्ये मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी, कळमनूरी यांनी असे सांगितले की, अर्जदारास आवश्यक असलेली सर्व माहिती (एकूण पृष्ठ संख्या १२) त्यांनी दिनांक- २७-०२-२००६ रोजी पुरविली आहे. या पत्रावर तहसील कार्यालयाने नोंदविलेली तारीख १७-०२-२००६ अशी आहे. एकाच पत्रावर दोन तारखा नमूद करण्याचे निश्चित काय प्रयोजन आहे ते जिल्हाधिकारी,हिंगोली यांनी जाणून घ्यावे . कारण या प्रश्नांचा खुलासा जनमाहिती अधिकारी करु शकले नाहीत.

अर्जदारास पुरविलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सादर केली आहे. आजच्या सुनावणीस अर्जदाराची अनुपस्थिती व अर्जदारास पुरविलेली माहिती,तहसील

कार्यालयाचे अभिलेखे पाहता याच बरोबर अर्जदाराने मागितलेली माहिती त्याला मिळाली असावी, असे अनुमान काढण्यात हरकत नाही. जनमाहिती अधिकारी कळमनूरी यांनी आज सुनावणीमध्ये असे सांगितले की, अर्जदाराने जी माहिती मागितली होती ती माहिती दरमहा तालूका दक्षता समितीतील सर्व सदस्यांना म्हणजे ( आमदार, खासदार, जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा विभाग, उपविभागीय कार्यालय, इत्यादी ) दरमहा देवून तसेच तहसील कार्यालयातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येत असते. या पार्श्वभूमीवर अर्जदाराने आयोगाकडे केलेले १९ (३) कलमा खाली केलेला अर्ज निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- ०२ एप्रिल, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. श्री. मधुकर लक्ष्मण आप्पा चेटप, आखाडा बाळापूर, तालूका- कळमनुरी, जिल्हा-हिंगोली.
२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनूरी.
३. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली.
४. जिल्हाधिकारी हिंगोली यांना निकालपत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
५. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकिय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या बेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक १०४/२००७

निर्णय दिनांक ०३ एप्रिल २००७

१ श्री. कवाने तुकाराम मारोतराव रा. येहळेगाव (तु.) तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली : अपीलकर्ता

**विरुध्द**

१ श्री. अनंतराव बाबुराव लोकरे, मुख्याध्यापक जि. प. हायस्कुल येहळेगाव (तु.) तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली तथा जन माहिती अधिकारी :

२ श्री. जगताप एस. एस. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कळमनुरी जिल्हा हिंगोली तथा अपीलीय अधिकारी : उत्तरवादी

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार स्वतः श्री. कवाने तुकाराम मारोतराव रा. येहळेगाव (तु.) तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली (यापुढे अर्जदार म्हणून संबोधण्यात येईल) हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जि. प. हायस्कुल येहळेगाव (तु.) तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली श्री. अनंतराव बाबुराव लोकरे, (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल), व अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कळमनुरी जिल्हा हिंगोली श्री. जगताप एस. एस. (यापुढे अपीलीय अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथम अर्जदाराने दिनांक २४-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील माहिती मागविली होती.

" ओ. बी. सी. वर्गातील मुलींना देय असलेले सन २००५-२००६ चे शासनाचे अनुदान आपल्या शाळेसाठी आजपावेतो प्राप्त झाले किंवा नाही याबाबत लेखी माहिती देण्याबाबत. "

याच बरोबर अर्जदाराने सन २००४ ते २००६ या वर्षात शालेय सुधारणा व साहित्य खरेदीकरिता पैसा किती आला, असे साहित्य किती आहे, साहित्य खरेदी वेळेस शिक्षण समितीच्या बैठका घेतल्या किंवा नाही तसेच खरेदीच्या वेळी सदस्य कोण होते. खरेदी प्रमाणे सामान आहे काय, संपूर्ण पावत्य सहीत माजी व आजी शिक्षण समितीचा हिशोब देणत यावा. शिक्षण समितीच्या बैठका लावाव्या, हिशोब द्यावा अशा प्रकारचे अतिरिक्त विधान सदर अर्जामध्ये अर्जदाराने केले आहे.

सदर माहिती अर्जदाराने व्यक्तीशः पाहिजे आहे किंवा कसे याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही. या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अर्जदारास दिनांक १९-०९-२००६ रोजी माहिती दिल्याचे पत्र आज अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केले. तथापि हे पत्र अर्जदारास मिळाले नसल्याचे अर्जदाराने आज सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे सांगितले की अर्जदाराने सदर पत्र घेण्यास नकार दिला.

तदनंतर अर्जदाराने दिनांक २६-०९-२००६ रोजी अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. त्या अपीलामध्ये त्यांनी त्यांची मूळ माहिती मागणी कायम ठेवली आहे. अर्जदाराच्या या अपीलावर अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांचेकडील पत्र क्रमांक ३१/२००६ दिनांक ३०-०९-२००६ अन्वये जन माहिती अधिका-याच्या कार्यालयास संपूर्ण माहिती विहित मुदतीत अर्जदारास द्यावी अशा आशयाचे पत्र लिहिले आहे. अपिलीय अधिका-याची अपिल ठरविण्याची ही कृती चुकीची आहे. दोन्ही बाजूकडील संबंधीतांना बोलावून घेऊन व त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर अंतिम निर्णय देणे या प्रसगी अभिप्रेत आहे याची जाणीव

अपिलीय अधिका-यास करुन देण्यात आली. अपिलीय अधिका-याच्या पत्रास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलीय अधिका-यास दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्रान्वये सदर माहिती देऊन त्याची एक प्रत अर्जदारास दिली आहे. अर्जदाराने सदर प्रत मिळाल्याचे आज सुनावणीत कबूल केले आहे.

तथापि ही माहिती अपुरी असल्याच्या कारणावरुन व्यथित होऊन अर्जदाराने आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अर्जदाराने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपीलाच्या प्रतीत माहिती ठिकाण व दिनांक यांचा उल्लेख केला नाही हे येथे नमूद करण्यात येत आहे. आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगापुढे सादर झालेल्या कागदपत्रावरुन अर्जदारास शासनाचे अनुदानातून शालेय सुधारणा व साहित्य खरेदीसाठी कोणत्या वेळेस शिक्षण समितीने मान्यता दिली होती त्या समितीच्या सदस्यांची नावे व अर्जदाराने मूळ अर्जात मागितलेल्या खरेदीचा तपशील अर्जदारास मिळाला नसल्याचे सिध्द होते. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेतला असता असे आदेशित करण्यात येते की, अर्जदारास जी माहिती अद्याप जन माहिती अधिकारी यांचेकडून देणे बाकी आहे ती सर्व माहिती अर्जदारास तीन दिवसात जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांची अर्जदारास संपूर्ण माहिती न देणे व जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी न घेणे या दोन्ही कृती त्यांची बेजबाबदार वृत्ती स्पष्ट करित आहेत याची संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने नोंद घ्यावी.

## निर्णय

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ अर्जदारास जी माहिती देणे बाकी आहे ती सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास तीन दिवसात विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक ०३ एप्रिल २००७

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कवाने तुकाराम मारोतराव रा. येहळेगाव (तु.) तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली

२ श्री. अनंतराव बाबुराव लोकरे, मुख्याध्यापक जि. प. हायस्कुल येहळेगाव (तु.) तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली तथा जन माहिती अधिकारी

३ श्री. जगताप एस. एस. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कळमनुरी जिल्हा हिंगोली तथा अपीलीय अधिकारी

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडे वरील निकालपत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्याकरिता.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १०६/२००७

निर्णय दिनांक ०३ एप्रिल २००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब माधवराव आहेर, विठ्ठल मंदिरा जवळ, जुना भावसिंगपुरा, छावणी, औरंगाबाद त्यांचे वकील श्री. संतोष व्ही. गस्तगार | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संत विश्रामबाबा विद्यालय भावसिंगपुरा औरंगाबाद तथा जन माहिती अधिकारी | : | |
| २ | सचिव छत्रपती शाहू टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि महाविद्यालय औरंगाबाद तथा अपीलीय अधिकारी त्यांचे वकील श्री. एस. एस. शेटे | : | प्रतिवादी |

**<u>विवेचन</u>**

या प्रकरणाची सुनावणी दिनांक २२ फेब्रुवारी २००७ रोजी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या वकीलानी सुनावणीची तारीख वाढवून मागितल्यावरुन त्यांना १२-०३-२००७ रोजी सुनावणीसाठी तारीख देण्यात आली. तथापि नंतर दिनांक १२-०३-२००७ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर झाल्यामुळे सदर अपीलाची सुनावणी दिनांक ०३-०४-२००७ रोजी ठेवण्यात आली.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदाराच्या वतीने ॲडव्होकेट संतोष व्ही. गस्तगार, तर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. एस. एस. शेटे हे हजर होते.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम दिनांक ११-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी संत विश्रामबाबा विद्यालय यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

१ " श्री संत विश्रामबाबा विद्यालय भावसिंगपुरा या शाळेच्या शैक्षणिक वर्ष १९९२-९३ ते १९९८ पर्यत शिक्षक संच मान्यतेच्या प्रमाणित प्रती.

२ शैक्षणिक वर्ष १९९२-९८ सर्व शिक्षक वैयक्तीक मान्यता प्रमाणित प्रती.

३ शैक्षणिक वर्ष १९९२-९८ सर्व शिक्षक हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रती

४ शैक्षणिक वर्ष १९९२-९८ पर्यत सर्व तुकड्या इ. ५ वी ते ८ वी विद्यार्थी हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रती.

५ शैक्षणिक वर्ष १९९२-९८ पर्यतचे विद्यार्थी पास-नापास दर्शविणा-या रजिस्टरचा मुळ प्रमाणित उता-याची प्रत

६ शैक्षणिक वर्ष १९९२-९८ शिक्षकांना दिलेल्या ऑर्डर प्रमाणित प्रती

७ शैक्षणिक वर्ष १९९२-९८ पर्यत जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी केलेल्या शाळा तपासणीच्या अहवालाच्या प्रमाणित प्रती

८ शैक्षणिक वर्ष १९९३-९६ पर्यत मुलांच्या ई. बी. फॉर्म व तक्त्यांच्या प्रमाणित प्रती".

अर्जदाराच्या या पत्रास अनुसरुन संबंधित मुख्याध्यापिका यांनी सदर माहिती या संस्थेतील जन माहिती अधिकारी श्री. जिवरग यांच्याकडून माहिती प्राप्त होईल असे अर्जदारास दिनांक ०९-०९-२००६ च्या पत्रानुसार कळविले. यावर अर्जदाराने दिनांक १८-०९-२००६ रोजी संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितली.

१ " श्री  संत विश्रामबाबा विद्यालय भावसिंगपुरा या शाळेच्या शैक्षणिक वर्ष  १९९० ते २००६ पर्यत शिक्षक संच मान्यतेच्या प्रमाणित प्रती.

२ शैक्षणिक वर्ष  १९९० ते २००६ पर्यत सर्व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता प्रमाणित प्रती.

३ शैक्षणिक वर्ष १९९० ते २००६ सर्व शिक्षक हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रती

४ शैक्षणिक वर्ष १९९० ते २००६ पर्यत सर्व तुकड्या इ. ५ वी ते ८ वी  विद्यार्थी  हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रती.

५ शैक्षणिक वर्ष १९९० ते २००६ पर्यतचे विद्यार्थी पास-नापास दर्शविणा-या रजिस्टरच्या मुळ प्रमाणित उता-याची  प्रत

६ शैक्षणिक वर्ष १९९० ते २००६ शिक्षकांना दिलेल्या ऑर्डरची प्रमाणित प्रती (नियुक्तीच्या)

७ शैक्षणिक वर्ष १९९० ते २००६ पर्यत जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी केलेल्या शाळा तपासणीच्या अहवालाच्या प्रमाणित प्रती ".

या माहितीमध्ये त्यांनी प्रथम मागितलेल्या मुद्यावरील माहितीमध्ये १९९२ ते १९९८ पर्यतच्या माहिती ऐवजी १९९० ते २००६ पर्यतची माहिती मागितली व मूळ अर्जातील माहिती - मुद्दा क्रमांक ८ हा वगळला आहे.

अर्जदाराच्या दिनांक १८-०९-२००६ च्या विनंती अर्जावर अर्जदारास जन माहिती अधिकारी श्री. नितीन डी. जिवरग यांनी दिनांक ०७-१०-२००६ रोजी खालील प्रमाणे उत्तर दिले आहे.

" आपणास कळविण्यात येते की श्री. संत विश्रामबाबा विद्यालय, भावसिंगपुरा येथे संस्थेच्या रेकॉर्डनुसार आपण शैक्षणिक वर्ष १९९३ ते १९९४ (१४-०६-१९९३ ते ३०-०४-१९९४)

या कालावधीत सह-शिक्षक (तात्पुरत्या स्वरुपात) काम केलेले आहे असे दिसते. सदरच्या काळात वरील शाळा विना अनुदान तत्वावर चालविली जात होती.

आपण मागणी केलेली कागदपत्रे ही संबंधित कालावधीतील व आपल्याशी संबंधीत नाही त्यामुळे आपली मागणी नौकरी केलेल्या कालावधीपुरती (१४-०६-१९९३ ते ३०-०४-१९९४) व आपल्याशी संबंधित करावी ही नम्र विनंती."

तदनंतर अर्जदार यांनी परत जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे पत्र दिनांक १४-१०-२००६ अन्वये त्याच माहितीची मागणी केली आहे. या दिनांक १४-१०-२००६ च्या पत्रास उत्तर म्हणून दिनांक ०६-११-२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी अर्जदारास सदर माहिती देण्यात येणा-या खर्चापोटी रुपये १६० इतक्या रक्कमेचा भरणा सदर संस्थेच्या कार्यालयामध्ये करण्या विषयी सुचविले. याही वेळी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास फक्त दिनांक १४-०६-१९९३ ते ३०-०४-१९९४ याच कालावधीतील व फक्त अर्जदारापुरतीच मर्यादित इतकी माहिती देण्याची तयारी दर्शविल्याचे जन माहिती अधिका-याच्या दिनांक ०६-११-२००६ च्या पत्रावरुन स्पष्ट होते.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अर्जदाराने दिनांक २०-११-२००६ रोजी अध्यक्ष / सचिव छत्रपती शाहू टेक्निकल इन्स्टिट्यूट ॲण्ड कॉलेज औरंगाबाद यांच्या कडे दिनांक ३०-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलाची सुनावणी संस्थेच्या सचिवांनी दिनांक २०-१२-२००६ रोजी घेतली व अपिलामध्ये अर्जदाराची फक्त १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापुरतीच म्हणजे अर्जदार संस्थेकडे सहशिक्षक म्हणून कार्यरत असतांनाच्या कालावधीपुरती माहिती देण्याचे मान्य केले व अर्जदाराची इतर माहिती संदर्भातील मागणी प्रथम अपील निर्णयामध्ये त्यांनी फेटाळून लावली.

यावर व्यथित होऊन अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये अर्जदाराने त्यांचे दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या अर्जात मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम केली व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी व जन

अपीलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० अन्वये मागणी केली.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये अर्जदार यांच्या वकीलांनी त्यांना सदर माहिती, अर्जदार यांचेवर झालेल्या अन्यायाची न्यायालयाकडे दाद मागण्यासाठीची आवश्यकता स्पष्ट केली. याच बरोबर माहिती अधिकार कायदा कलम २ (ज) (घ) (१) व कलम ३ प्रमाणे सदर संस्था हे सार्वजनिक प्राधिकरण असून कोणत्याही नागरिकास या संस्थेकडे वरील सर्व माहिती मागण्याचा हक्क असल्याचे प्रतिपादन केले व आपल्या अर्जातील मागणी कायम ठेवली.

अर्जदाराच्या या युक्तीवादावर संस्थेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की सदर अर्जदार हे या संस्थेमध्ये १९९३-९४ या वर्षात हंगामी स्वरुपात अनट्रेंड शिक्षक म्हणून कामाला होते व त्या वेळी शासनाकडून या संस्थेस कोणतीही मदत मिळत नव्हती. सबब माहिती अधिकार कायद्यातील कलम २ (ज) (घ) (१) अन्वये दर्शविलेल्या शासकीय प्राधिकरण या वर्गाखाली व्याख्येमध्ये येत नव्हती व त्यामुळे माहिती अधिकार कायदा २००५ हा या संस्थेस लागू होत नाही म्हणून सदर अपील विचारात घेण्यायोग्य नाही. याच बरोबर अर्जदार हे फक्त एक वर्ष इतक्या कालावधीत सदर संस्थेमध्ये नोकरीत असतांना देखील त्यांनी १९९० ते २००६ या कालावधीतील माहिती मागणे हे कायदेशीर नाही व ही माहिती त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे संबंधित नाही हा मुद्दा त्यांनी पुढे मांडला. त्यांनी युक्तीवादामध्ये पुढे, अर्जदाराने इतर शिक्षकांविषयी माहिती मागितलेली आहे व सदर शिक्षकांनी संस्थेच्या मुख्यध्यापिकेला आपली माहिती न कळविण्याविषयी पत्र दिले असल्यामुळे ही माहिती अर्जदारास देता येत नाही असे स्पष्ट केले.

थोडक्यात अर्जदार ज्या कालावधीमध्ये या संस्थेमध्ये अप्रशिक्षित शिक्षक म्हणून कार्यरत होते त्या कालावधीमध्ये सदर संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान प्राप्त होत नव्हते म्हणून माहिती अधिकार कायदा २००५ हा सदर संस्थेस लागू होत नाही. त्याच बरोबर संस्थेतील इतर शिक्षकांनी दिनांक ११-१०-२००६ च्या पत्राव्दारे सदर माहिती कोणासही देऊ नये असे मुख्याध्यापकास कळविले असल्याने अर्जदाराचे अपिल फेटाळावे असा संस्थेचा युक्तीवाद आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेतला असता संस्थेच्या वतीने केलेला हा युक्तीवाद की, "माहिती अधिकार कायदा २००५" हा कायदा या संस्थेस अर्जदाराने माहिती मागविलेल्या कालावधी मध्ये शासकीय अनुदान प्राप्त होत नसल्याने सार्वजनिक प्राधिकरण होऊ शकत नाही." अमान्य करण्यात येत आहे. कोणतीही शैक्षणिक संस्था सुरु करण्यापुर्वी ती काही काळ विना अनुदानीत तत्वावर चालवावी लागते व ही सदर संस्था शासन मान्यताप्राप्त होण्यासाठीची ती पुर्व अर्हता आहे. आजामितीस सदर संस्थेस १०० टक्के शासकीय अनुदान मिळत असल्याने सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण या सदराखाली मोडते व म्हणून माहिती अधिकार कायदा २००५ हा सदर संस्थेस लागू आहे असे आयोगाचे स्पष्ट मत आहे.

संस्थेतील शिक्षकांनी त्यांचेसंबंधीची वैयक्तीक स्वरुपाची माहिती देवू नये अशा आशयाची जी पत्रे दिली असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे त्यासंदर्भात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता शिक्षकांना देण्यात आलेल्या वैयक्तीक मान्यतेच्या शासकीय कार्यालयांच्या (शिक्षणाधिकारी कार्यालयाने दिलेल्या) आदेशाच्या प्रतिंची अर्जदाराने मागणी केली असल्याचे दिसते. सदर माहिती जरी त्रयस्थ पक्षासंबंधी असली तरी ती शिक्षकांना शासकीय कार्यालयाने दिलेल्या मान्यता संदर्भात असून ती वैयक्तिक व गोपनीय स्वरुपाची नाही. सदर बाबी उघड केल्यामुळे त्रयस्थ पक्षास कोणती हानी होणार आहे किंवा त्यांचे कोणते वैयक्तिक स्वातंत्र्य आकुंचित होणार आहे हे संस्थेतर्फे स्पष्ट करण्यात आलेले नाही.

माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ८ मध्ये कोणत्या प्रकारची माहिती देता येणार नाही याचा उल्लेख आहे. यामध्ये स्पष्ट करण्यात आलेली कोणतीही तरतूद अर्जदाराने मुळतः केलेल्या मागणीस लागू होत नाही. मुळात हा कायदा शासकीय प्राधिकरणाच्या कारभारामध्ये पारदर्शकता आणण्याकरिता व जनतेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या मूळ हेतुने पारित केला आहे. एकदा शासकीय प्राधिकरण म्हणून मान्यता मिळाली की या कायद्यातील सर्व तरतुदी संबंधित संस्थेस तंतोतंत लागू होतात. या कायद्यामध्ये किती कालावधी पुर्वीची माहिती मागवू शकतो किंवा शकत नाही यासंबंधी कोणतीही तरतूद नाही. माहिती देणे हा नियम व

नाकारणे हा अपवाद हा या कायद्याचा गाभा आहे. या पार्श्वभुमीवर अर्जदाराने मागितलेली संपूर्ण माहिती सदर संस्थेने देणे भाग आहे. त्याचबरोबर शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या शासकीय आदेशाच्या प्रती दिल्यामुळे त्रयस्थ पक्षाची कोणतीही हानी होणार नाही परंतु व्यापक जनहित मोठ्या प्रमाणात साध्य होईल असे आयोगाचे मत झाले आहे.

त्याचबरोबर कोणत्याही नागरिकास कोणत्याही शासकीय प्राधिकरणाकडे कोणत्याही प्रकारची माहिती विचारण्याचा अधिकार माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये प्राप्त झाला आहे त्यामुळे अर्जदाराने मागितलेली माहिती किती विस्तृत असली तरी सदर शिक्षण संस्थेने अर्जदाराने त्याच्या दिनांक १८-०९-२००६ च्या अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अर्जदारास ३० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे. त्याच बरोबर सदर माहिती देण्यास संस्थेने जाणुन बुजून टाळाटाळ केली असे निर्विवादपणे सिध्द होऊ शकत नसल्यामुळे अर्जदाराने जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची केलेली मागणी फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ अर्जदाराने त्यांच्या दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये मागितलेली संपूर्ण माहिती अर्जदारास छत्रपती शाहू टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि महाविद्यालय औरंगाबाद या संस्थेने तीस दिवसात विनामुल्य पुरवावी. विहित मुदतीत माहिती देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची राहील.

औरंगाबाद

दिनांक ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

<u>प्रत,</u>

१ श्री. बाळासाहेब माधवराव आहेर, विठ्ठल मंदिरा जवळ, जुना भावसिंगपुरा, छावणी, औरंगाबाद

२ संत विश्रामबाबा विद्यालय भावसिंगपुरा औरंगाबाद तथा जन माहिती अधिकारी

३ सचिव छत्रपती शाहू टेक्निकल इन्स्टिटयूट आणि महाविद्यालय औरंगाबाद तथा अपीलीय अधिकारी

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक ११०/२००७

निर्णय दिनांक ०४ एप्रिल २००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नंदकुमार बाबुराव लोहाडे, रा. समर्थनगर, कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद | : | |
| २ | अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**<u>विवेचन</u>**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. नंदकुमार बाबुराव लव्हाडे (यापुढे त्यांना अर्जदार संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी संबोधण्यात येईल), औरंगाबाद श्री. एस. पी. राठोड व जन अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी (यापुढे त्यांना अपीलीय अधिकारी संबोधण्यात येईल), औरंगाबाद श्री दिलीप जमादार हे हजर होते.

या प्रकरणी सर्व प्रथम अर्जदाराने दिनांक २३-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे मागणी केली होती.

" चंदुलाल टी पारीख बीपीसी कंपनी डिलर केरोसीन डिलर परवाना जुना क्रमांक ७/६६ हा होता व सन १९८८ पर्यत नुतनीकरण होता. त्यानंतर आपण हा परवाना सी. टी. पी. ॲण्ड कंपनी परवाना क्रमांक १९८८/एसबी/डेस्क-२//सीआर-२७ या नावाने दिनांक २२-०१-९८ रोजी दिला. सन १९८८ ते सन १९९८ पर्यतच्या दहा वर्षे नुतनीकरणाचा परवानाची नकल देण्यात यावी व साठा परवानाची सन १२-१२-९१ ते सन २००३ या कालावधीची साठा परवानाची नक्कल देण्यात यावी व सन १९९० ते सन २००४ पर्यतच्या शॉप ॲक्ट परवान्याची नक्कल देण्यात यावी."

अर्जदाराने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. (अर्जदाराच्या या माहिती अर्जावर अर्जदारास जन माहिती अधिका-याने प्रथम उत्तर त्यांच्या कार्यालयाचे पत्र दिनांक २२-०२-२००७ अन्वये दिल्याचे दिसते. सदर पत्रामध्ये अर्जदारस जन माहिती अधिका-याने फक्त साठा परवान्या संदर्भात माहिती दिलेली आहे. तथापि केरोसीन डिलर परवान्याच्या नुतनीकरणासंबंधी अर्जदारास कोणतीही माहिती पुरविण्यात आलेली उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.)

तदनंतर आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे अर्जदाराने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या माहितीमध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे. सदर अपीलावर दिनांक २९-०१-२००७ रोजी अपीलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेण्याचे ठरले होते तथापि त्या तारखेला कोणीही हजर न झाल्यामुळे दिनांक १४-०२-२००७ रोजी व्दितीय सुनावणी ठेवण्यात आली तथापि त्या दिवशी अपीलीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे या प्रकरणाची अंतीम सुनावणी दिनांक २३-०३-२००७ रोजी घेण्यात आली. या सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अर्जदारास राज्य माहिती आयोगापुढील सुनावणी पुर्वी माहिती पुरवावी असे अपीलीय अधिकारी यांनी निर्देश दिले असे अपिलीय

अधिकारी यांनी आयोगास दाखविलेल्या नस्तीवरुन दिसते. अपिलीय अधिका-याने सुनावणीवरील निर्णय वेगळ्या आदेशाव्दारे देणे अभिप्रेत आहे. अपिलीय अधिका-याची या प्रकरणातील सदर कृती चुकीची आहे.

तथापि यानंतरही अर्जदारास आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे अर्जदाराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज सुनावणीमध्ये झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असे स्पष्ट करण्यात आले की त्यांच्याकडे अर्जदाराने मागितलेली १९८८ ते १९९८ या कालावधीतील रॉकेल डिलर परवाना नुतनीकरणासंबंधी माहिती सध्या उपलब्ध नाही. या दहा वर्षामध्ये परवाना प्राधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी हे अधुन मधुन कार्यरत होते. कोणी एक विशिष्ट अधिकारी सलगपणे परवाना प्राधिकरण म्हणून कार्यरत नव्हता. त्यामुळे ही माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता असे आदेशित करण्यात येते की जन माहिती अधिका-याने अर्जदारास ३० दिवसात अर्जदाराच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती पुरवावी.

## निर्णय

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांनी अर्जदार यांनी त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती अर्जदारास ३० दिवसात अर्जदार यांना पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक ०४ एप्रिल २००७

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदकुमार बाबुराव लोहाडे, रा. समर्थनगर, कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद

३ अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक ११७/२००७

निर्णय दिनांक १० एप्रिल २००७

१ एम. एन. रोडगे, 'योगेश निवास' बी. फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद :

२ अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक लातूर विभाग, लातूर : प्रतिवादी

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. एम. एन. रोडगे (यापुढे त्यांना अपीलकर्ता संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद श्री. सुरेश बाबुजी कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी संबोधण्यात येईल), आणि जन अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक लातूर विभाग लातूर श्री. अरुण ठाकरे (यापुढे त्यांना अपीलीय अधिकारी संबोधण्यात येईल) हे हजर होते.

अपीलकर्त्याने या प्रकरणात दिनांक १०-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे उस्मानाबाद जिल्ह्यातील ५२ टक्के आरक्षण पूर्ण न करणा-या शाळांची यादी मागितली होती.

माहितीचा कालावधी अपीलकर्त्याने त्यांच्या अपीलामध्ये दिनांक २००७ हे वर्ष असा दिला असून सदर माहिती अपीलकर्त्याने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलकर्त्याने या अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र दिनांक १३-१२-२००६ अन्वये जिल्ह्यातील सर्व शाळांची माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही व माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन देण्याची माहिती अधिकार कायद्यात तरतूद नाही त्यामुळे ही माहिती दिलेली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की त्यांच्या कार्यालयाकडे जिल्ह्यातील शाळेत नवनियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या मान्यतेसाठी चे प्रस्ताव येतात त्यातील अनुशेष तक्त्यानुसार मान्यतेबाबत कार्यवाही केली जाते. त्यामुळे अपीलकर्त्यास अपेक्षित असलेल्या स्वरुपात ते माहिती देऊ शकत नाही.

यावर अपीलकर्त्याचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्त्याने माहिती अधिकार कायदा २००५ कलम १९ (१) अन्वये दिनांक १९-१२-२००६ रोजी जन अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपीलकर्त्याने त्यांच्या मुळ अर्जातील मागणी कायम ठेवली असून शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी संघटनेने मागितलेली माहिती आजतागात न दिल्यामुळे प्रथम अपील केल्याचे कारण दर्शविले आहे.

यावर जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता त्यांचेकडील पत्र क्रमांक १४३/४४, दिनांक ०३ जानेवारी २००७ रोजी पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना, " आपण उस्मानाबाद जिल्ह्याचे नियंत्रण अधिकारी असल्यामुळे संस्थांकडून माहिती संकलीत करुन संबंधितांना त्वरीत द्यावी " अशी सूचना करणारे पत्र दिले. अपीलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची पध्दत ही बरोबर नसून त्यांनी दोन्ही बाजुच्या पक्षकारांना बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर अंतीम निर्णय देणे ही अपीलीय प्रक्रिया अभिप्रेत आहे असे त्यांना सांगण्यात आले.

तथापि यावर समाधान न झाल्यामुळे व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगा कडे दिनांक २७-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. व्दितीय अपीलामध्ये देखील अपीलकर्त्याने त्यांची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संस्थानिहाय तयार असून ती अपीलकर्त्यास त्वरीत एका दिवसात पुरविण्यात येईल असे आयोगा समोर शपथपत्रावर कबूल केले आहे. अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा अभ्यास करुन त्याचे त्यांना आवश्यक असलेल्या पध्दतीने पृथकरण करुन त्यानुसार पुढील कारवाई करण्यास त्यांना मुभा आहे. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी शपथपत्रावर एका दिवसात देण्याचे कबूल केल्याने अपीलकर्त्याचे अपील निकाली काढण्यात येत आहे. त्याच बरोबर जन माहिती अधिका-याने अशा प्रकारे कोणत्याही नागरिकाने अर्ज केल्यास माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये विहित मुदतीत माहिती पुरवावी व माहिती न देण्याची कारणे शोधू नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१ अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १० एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

<u>प्रत,</u>

१ श्री. एम. एन. रोडगे, 'योगेश निवास' बी. फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद

३ अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक लातूर विभाग, लातूर

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १२०/२००७

निर्णय दिनांक १० एप्रिल २००७

श्री. धनराज नरसू अंबाड, ह. मु. गोरे निवास, : अपीलार्थी
नेजाती शाळेजवळ, प्रशांतनगर, अंबाजोगाई
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, बीड :
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप : प्रतिवादी
निबंधक, सहकारी संस्था, बीड

**विवेचन**

वरील प्रकरणात आज आज दिनांक १०-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. धनराज नरसू अंबाड (यापुढे त्यांना अपीलार्थी संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. बीड श्री. ए. एम. कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी संबोधण्यात येईल), आणि जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे वतीने त्यांचे कार्यालयातील प्रमुख लिपीक श्री. केदार हे हजर होते. अर्जदाराच्या वतीने ॲडव्होकेट श्री. पी. एस. पवार तर जन माहिती अधिकारी यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. व्ही. एन. उपाध्ये हजर होते.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक ०४-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" सेवा सहकारी सोसायटी बनसारोळा यांचे संदर्भात ऑक्टोंबर २००५ ते १५ ऑगस्ट २००६ या वर्षात आपल्या शाखेमार्फत सभासदांना केलेला पत पुरवठा, खरीप, ऊस, यादीनिहाय सभासदांच्या वाटपाबाबतची माहिती देण्या विषयी. (सोबत- १) सभासदांकडून घेतलेले कागदपत्रे साक्षांकित देणे, २) वरिष्ठ कार्यालयाने ऊस पत पुरवठ्या साठी के.म.मंजुरीचे आदेशाची सत्यप्रती देण्यात याव्यात.

अपिलार्थीने सदर माहिती ऑक्टोंबर २००५ ते १५ ऑगस्ट २००६ या कालावधीची अपेक्षिली होती तसेच अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांचे कडील पत्र दिनांक १५-०९-२००६ अन्वये रुपये १३,०७२ इतके शुल्क भरण्या बाबत कळविले. तथापि शुल्क आकारण्यात काही चूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर दिनांक २७-०९-२००६ रोजी रुपये ५९१२ रुपये इतके शुल्क बॅकेच्या बनसारोळा शाखेत भरण्याबाबत कळविले. तदनंतर अपीलार्थी यांनी आवश्यक शुल्क रुपये ५९१२ हे दिनांक १४-१०-२००६ रोजी भरणा केल्याचे बॅकेला कळविले. अपीलार्थी यांनी दिनांक १४-१०-२००६ रोजी बनसारोळा येथे भरणा केले व बीड येथील बॅकेस दुरध्वनीव्दारे त्याच दिवशी भरणा केल्याचे कळविले. तदनंतर माहिती अधिका-याने दिनांक २०-१०-२००६ रोजी अपीलार्थी यांना पत्र देऊन, सदर माहिती तयार असून आपण फीस भरुन घेऊन जावी असे कळविले. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यकाकडून दिनांक ०५-११-२००६ रोजी अपीलार्थीस प्राप्त करुन देण्यात आली.

तथापि माहितीची वाट न पाहता अपीलार्थी यांनी दिनांक २६-१०-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपीलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व वाव (scope) पुर्णतः बदलेला असून अपीलार्थीने माहितीचा केलेला मूळ अर्ज व प्रथम अपीलामध्ये केलेली मागणी या दोन्ही मागण्या भिन्न आहेत. अपीलार्थी

च्या प्रथम अपीलाची सुनावणी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००६ रोजी अंतीमः घेतली. सदर अपील अंशतः मंजूर केले व यामध्ये अपीलार्थी यांना चार संचालकाच्या कागदपत्राच्या प्रती दिलेल्या नाहीत त्या देण्यात याव्यात अशी सूचना जन माहिती अधिकारी यांना दिल्या आहेत.

तथापि सदर माहिती वेळेत दिली नाही, चुकीची दिली, माहिती अधिकारातील माहितीचे पैसे चुकीचे व जास्तीचे वाजवीपेक्षा जास्त भरावयास सांगितले या कारणास्तव अपिलार्थीने राज्य आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी प्रथम अपीलामध्ये पहिल्या अर्जामध्ये केलेल्या माहितीची मागणी व अपीलामध्ये केलेल्या माहितीची मागणी या दोन्ही माहितीत कोणत्या ही प्रकारची सुसंगती दिसून येत नाही. मात्र विविध सहकारी सोसायटी बनसारोळा तालुका केज जिल्हा बीड या संस्थेमध्ये पत पुरवठा करण्यात आलेल्या ऑक्टोंबर २००५ ते १५ ऑगस्ट २००६ या कालावधीमध्ये पत पुरवठा करण्यात भ्रष्टाचार झाला असल्याच्या आपल्या भुमिकेवर अपीलार्थी ठाम आहेत असे आढळून आले. तद्वतच अपीलार्थी यांना ज्या चार सदस्यांची माहिती अपेक्षित आहे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशानंतरही प्राप्त होऊ शकलेली नाही त्यामुळे अपीलार्थीचा या प्रकरणात संशय जास्त बळावला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपीलार्थीना हवी असलेल्या माहितीची योग्य त्या स्वरुपात मांडणी त्यांनी केलेली नाही तथापि उपरोक्त सहकारी संस्थेमध्ये भ्रष्टाचार झाला असा त्यांचा ठाम समज आहे. अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी मध्ये या विषया संदर्भातील सर्व नस्त्या, कागदपत्रे अपिलार्थीस तात्काळ उपलब्ध करुन देण्याची आज तयारी दर्शविली आहे.

वरील पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन माहिती अधिकारी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक यांनी सदर अपिलार्थीस ऑक्टोंबर २००५ ते ऑगस्ट २००६ या कालावधीमध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बनसारोळा ता. केज जिल्हा बीड यांना केलेल्या पत पुरवठ्या संबंधित

सर्व कागदपत्रे, पत्रव्यवहार / तद अनुषंगिक इतर नस्त्या अपीलार्थीने तशी लेखी मागणी केल्यापासून एका दिवसाच्या आत अपीलार्थीस पाहण्यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे आदेशित करण्यात येत आहे व अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१ अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १० एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धनराज नरसू अंबाड, ह. मु. गोरे निवास, नेजाती शाळेजवळ, प्रशांतनगर, अंबाजोगाई जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. बीड

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १२१/२००७

निर्णय दिनांक ११ एप्रिल २००७

श्री. विनायक गंगाधर पाठक, "पायस" : अपीलकर्ता
विश्रामबाग, पदमपुरा, युथ होस्टेल जवळ,
औरंगाबाद - ४३१ ००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य मराठवाडा :
सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण
महाविद्यालय, खडकेश्वर, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव मराठवाडा : प्रतिवादी
सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण
महाविद्यालय, खडकेश्वर, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. विनायक गंगाधर पाठक (येथून पुढे अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर औरंगाबाद डॉ. एस. एम. कादरी (येथून पुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा सचिव मराठवाडा सांस्कृतिक

मंडळ शारिरीक  शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर औरंगाबाद श्री. रामभाऊ पातुरकर (येथून पुढे जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर होते.

अपीलार्थी हे मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक  शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर औरंगाबाद येथे व्याख्याता म्हणून कार्यरत आहेत.  अपीलार्थी हे दिनांक ३० सप्टेंबर २००७ रोजी नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्त होणार आहेत.  सेवानिवृत्तीनंतरचे त्यांना मिळणारे सेवानिवृत्ती वेतन वेळेत प्राप्त व्हावे व सदर वेतनाची  रक्कम ही त्यांना नियमानुसार देय असणा-या रकमे इतकी मिळावी, व तदअनुषंगीक देयके वेळेत मिळावीत या उद्देशाने अपीलार्थी यांनी संस्थेकडे सेवानिवृत्ती पुर्वी आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करण्याकरिता वेळोवेळी वेगवेगळ्या अर्जाव्दारे संस्थेकडून, प्राचार्याकडून माहिती मागवित आहेत परंतु अपीलार्थी यांना संस्थेकडून व प्राचार्या कडून योग्य प्रतिसाद मिळत नाही असे वाटल्यावरुन अर्जदाराने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ६ (१) अन्वये महाविद्यालयाच्या जन माहिती अधिका-याकडे दिनांक ०२-०२-२००६ रोजी अर्ज करुन अर्जामध्ये खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

१ सेवा पुस्तिका व भविष्य निर्वाह निधी

२ सेवा जेष्ठता यादी

३ न्यायाधिकरणाच्या आदेशाचे अनुपालन

४ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचच्या आदेशाचे अनुपालन.

सदर माहिती अपीलार्थी यांनी व्यक्तिशः अपेक्षिली होती.  अपीलार्थी यांच्या अर्जामध्ये माहितीचा कालावधी २००० ते २००६ असा उल्लेख केलेला आहे.  अपीलार्थीच्या या दिनांक ०२-०२-२००६ च्या अर्जावर प्रथम जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०३-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले.  सदर उत्तर खालील प्रमाणे आहे.

१ दिनांक १८-११-२००५ नुसार डॉ. व्ही. जी. पाठक यांचे वेतन व भत्ते देण्याची कार्यवाही करावी. मा. ट्रिब्युनल अपील क्रमांक ०५/२००४ चा निकाल कायम केला आहे.

२ वरील पत्रानुसार १३-१२-२००५ रोजी महाविद्यालयाने पत्रव्यवहार करुन महाविद्यालयाला

मिळणा-या अनुदानातून हे पैसे द्यावेत असा उल्लेख आहे.

३ सर्व्हिसबुक अपूर्ण आहे.

४ जेष्ठता सूची देण्यात येत असून डॉ. व्ही. जी. पाठक यांचे नांव हजेरी पटात क्रमांक ११ वर आहे.

५ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच औरंगाबाद यांच्या आदेशानुसार व्याज अजुनही भरलेले नाही. केस सुरु आहे.

अपीलार्थीने मागितलेली मुळ माहिती व त्यास ३० दिवसाच्या कालावधीनंतर दिलेले उत्तर पाहता त्यामध्ये मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर औरंगाबाद या संस्थेचा अपीलार्थीने मागणी केलेल्या अर्जाकडे पाहण्याचा नकारात्मक व निष्क्रीयतेचा दृष्टीकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्या उत्तरामध्ये अपीलार्थी यांनाच त्यांचे वेतन व भत्ते देण्याची कारवाई करण्या बाबत सुचित करण्यात आले आहे. सेवा जेष्ठता यादी बाबत कोणताही उल्लेख नाही परंतु हजेरीपटातला क्रमांक उल्लेख आहे. अपीलार्थीने हजेरीपटाच्या क्रमांकाची मागणी केली नव्हती. तद्वतच परिच्छेद २ व ५ ची उत्तरे पाहता जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांच्या आदेशाचे देखील वेळेत पालन करण्याची तयारी या संस्थेची नाही हे अत्यंत खेदपूर्वक येथे नमूद करण्यात येत आहे. शासकीय अनुदानातून चालणा-या या महाविद्यालयातील कर्मचा-यांची / शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी सदर संस्था स्थापन झाल्यापासून गेल्या ३८ वर्षात एकदाही केली नाही ही आश्चर्याची बाब म्हणावी लागेल. **याबाबत संचालक क्रीडा व सचिव शालेय शिक्षण यांनी वैयक्तीक लक्ष घालून शासकीय अनुदाना दिल्या जाणा-या सर्व संस्थामध्ये त्यांच्या कर्मचा-यांच्या / शिक्षकांच्या सेवा जेष्ठता नियमितपणे व अद्यावत ठेवण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी. तसेच शासकीय अनुदान घेणा-या अशा प्रकारच्या सर्व संस्थामधील सर्व कर्मचा-यांची सेवा पुस्तके अद्यावतपणे ठेवली आहे की नाही याची संबंधित शिक्षणाधिका-यामार्फत वर्षातून एकदा तपासणी करावी व ज्या संस्था कर्मचा-यांची सेवा पुस्तीका अद्यावत पणे भरत नसतील, ज्या संस्थेमध्ये कर्मचा-यांच्या सेवा जेष्ठता याद्या**

**नियमितपणे प्रसिध्द होत नाहीत अशा संस्थावर आवश्यक वाटल्यास सरकारी अनुदान थांबविण्याची, योग्य त्या कायद्यान्वये, कडक कारवाई करण्याबाबतचा विचार करावा असे या प्रकरणी त्यांना आदेशित करण्यात येत आहे.**

अपीलार्थीचे जन माहिती अधिका-याच्या अशा प्रकारच्या विसंगत व अपु-या माहितीवर समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने महाविद्यालयाच्या अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दिनांक २७-०४-२००६ रोजी केले. या अपीला मध्ये अपीलार्थी यांनी त्यांची मुळ मागणी कायम ठेवली असून त्याची सेवा पुस्तिका लवकर पूर्ण करुन द्यावी अशी मागणी केली आहे. दिनांक २७-०४-२००६ रोजी अपील दाखल केल्यापासून दोन महिन्यानंतर सुनावणी घेण्यात आली. मध्यंतरीच्या काळात २ तारखा झाल्या. त्या २५ मे २००६, व १२ जून २००६ अशा आहेत. सदर अपीलामध्ये अपीलार्थीची अपूर्ण सेवा पुस्तिका व भविष्य निर्वाह निधीचे रेकॉर्ड प्राचार्यानी पूर्ण करावी अपीलीय अधिका-यांनी सुचित केले.

तथापि वरील निर्णयाच्या अनुपालनाच्या दृष्टीने काहीही कारवाई न झाल्याचे अपीलार्थीस वाटल्यावरुन अपीलार्थी यांनी दिनांक ०२-१०-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. अपीलार्थीला व्दितीय अपील करण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण अपीलार्थीस निकालाची प्रत दिनांक २०-०९-२००६ रोजी मिळाल्याचे सांगण्यात आले. आयोगाला दिलेल्या माहिती अधिकार कायदा २००५ कलम १९ (३) मधील दिलेल्या शक्तीचा वापर करुन अपीलार्थीचे व्दितीय अपील करण्याकरिता लागलेला विलंब क्षमापित करण्यात येत असून अपीलार्थीने केलेल्या अपीलाची सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी केलेल्या मुळ अर्जातील सर्व मुद्दयां वर युक्तीवाद अपिलार्थी व उत्तरवादी यांनी केला. अपीलार्थीने मागणी केलेल्या मुद्यापैकी २ मुद्दे वेगळ्या न्यायालयीन प्राधिकरणाकडे प्रलंबित असल्यामुळे त्यावर चर्चा करण्यात आली नाही. तथापि अर्जदाराच्या मुळ अर्जातील उर्वरीत ३ मुद्दे सेवा पुस्तिका, भविष्य निर्वाह निधी व सेवा जेष्ठता या मुद्यावर युक्तीवाद करण्यात आला. युक्तीवादामध्ये संस्थेतर्फे संस्थेने त्यांच्याकडील

कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी अद्याप संस्था स्थापन झाल्यापासून तयार करण्यात आली नसल्याचे, अपीलीय अधिकारी यांनी कबूल केले. त्याच बरोबर अपीलार्थीची सेवा पुस्तिका पूर्ण करुन संचालक क्रीडा यांच्याकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी पाठविण्यात आली आहे असे उत्तरवादी यांनी सांगितले. सदर पत्राचे अवलोकन केल्यावर या प्रकरणी पाठविलेल्या पत्रामध्ये त्यांनी अपीलार्थीची सेवा निवृत्ती वेतनासाठी केव्हापासून ग्राह्य धरावी याचे मार्गदर्शन मागितले आहे. याच वेळी या सेवापुस्तकांमध्ये काही ठिकाणी प्राचार्यांनी सह्या केल्या नसल्याचे अपीलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. याबाबत उत्तरवादी यांना पृच्छा केली असता दोन्ही उत्तरवादी समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत तथापि प्राचार्य शारिरीक शिक्षण महाविद्यालय यांनी पुण्याला तात्काळ स्वतः जाऊन सेवापुस्तकातील त्रुटींची सात दिवसात पुर्तता करण्याचे कबूल केले. **तेव्हा संचालक क्रीडा महाराष्ट्र राज्य पुणे यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर औरंगाबाद यांचे क्रमांक ४१८ दिनांक २२-०३-२००७ च्या पत्रावर एप्रिल २००७ अखेरपर्यंत आपल्या स्तरावरील कार्यवाही पूर्ण करावी व अपीलार्थीच्या सेवा निवृत्तीसाठी या मुदतीच्या आत ग्राह्य दिनांक अंतीम करावा**. भविष्य निर्वाह निधी बाबत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने आदेश दिले असून त्या आदेशाचा अनुपालनही दिला नाही याबद्दल वेगळे न्यायालयीन प्रकरण ग्राहक मंचाकडे चालू आहे. अपीलार्थीच्या प्रस्तावित सेवा जेष्ठते संदर्भात पूर्ण प्रस्ताव संचालक क्रीडा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचेकडे एकाच वेळी सात दिवसाचे आत वेगवेगळ्या पत्राव्दारे पाठविण्याचे अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगा समोर शपथपत्राव्दारे कबूल केले. त्याप्रमाणे संबंधित महा विद्यालयाचे प्राचार्य यांनी वेळेतच कारवाई करावी. **सदर संस्थेचा अर्ज विद्यापीठास व संचालक क्रीडा यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत विद्यापीठ व संचालक क्रीडा यांनी सर प्रकरणा संदर्भात अंतीम निर्णय घेऊन तो अपीलार्थीस व संस्थेस कळवावा असेही आदेशित करण्यात येत आहे.** या सर्व प्रकरणावरुन या संस्थेच्या कारभारात पारदर्शकतेचा

अभाव दिसत असून संस्थेमधील कर्मचा-यांची सेवा पुस्तिका अद्यावत नसणे त्यांची सेवा जेष्ठता यादी संस्थेच्या स्थापनेपासून ३८ वर्षानंतरही तयार नसणे इत्यादी बाबी उद्वेगजनक आहेत असे आयोगास वाटते. संस्थेस पुढील वर्षी अनुदान देतांना या मुद्यांचा पुरेशा गांभीर्याने विचार करुन संचालक क्रीडा व सचिव शालेय शिक्षण यांनी निर्णय घ्यावा अशी आयोगाची शिफारस आहे. **त्याच बरोबर आयोगास माहिती अधिकार कायद्याच्या कलम २५ (३) (जी)अन्वये दिलेल्या शक्तीचा वापर करुन अशा प्रकारच्या संस्थांच्या कारभारात संपूर्ण पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने काय कारवाई करता येईल याचाही विचार करुन त्या दृष्टीने शासनाने पावले उचलवावीत असे या प्रसंगी नमूद करण्यात येत आहे.**

वरील युक्तीवादावरुन व आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या शपथपत्रावरुन अपीलार्थीचे व्दितीय अपील मुळ माहितीचा अर्ज आता निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलार्थीची सेवापुस्तिका सात दिवसात प्राचार्य मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर औरंगाबाद यांनी, आवश्यक वाटल्यास, क्रीडा संचालक यांचे कार्यालयात जाऊन सर्व दृष्टीने पूर्ण करावी.

३. सस्थेतील कर्मचा-यांची सेवा जेष्टता यादी अद्यावत करुन संचालक क्रीडा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्याकडे पाठवावी. संस्थेकडून सदर यादी पाठविल्यानंतर एक महिन्याच्या आत मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्राचार्य व संस्थेचे सचिव यांनी सकारात्मक प्रयत्न करावेत.

४. संचालक क्रीडा व कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी सदर महाविद्यालयाकडून या विषया संदर्भात सदर संस्थेकडून प्राप्त होणा-या सर्व

संदर्भाची प्राथम्याने दखल घेऊन, सदर संदर्भ त्यांचेकडे लेखी स्वरुपात प्राप्त झाल्यानंतर, आपला अंतीम निर्णय एक महिन्याच्या आत द्यावा.

औरंगाबाद

दिनांक ११ एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

<u>प्रत,</u>

१ श्री. विनायक गंगाधर पाठक, "पायस" विश्रामबाग, पदमपुरा, युथ होस्टेल जवळ, औरंगाबाद - ४३१ ००५

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर, औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव मराठवाडा सांस्कृतिक मंडळ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, खडकेश्वर, औरंगाबाद

४ संचालक (क्रीडा) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत बी. जे. रोड, पुणे. वरील प्रमाणे नोंद घेण्यासाठी.

५ कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. वरील प्रमाणे नोंद घेण्यासाठी.

६ सचिव, (शिक्षण) मंत्रालय मुंबई. वरील प्रमाणे नोंद घेण्यासाठी.

७ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १२७/२००७

निर्णय दिनांक १२ एप्रिल २००७

श्री. बसवराज विश्वनाथ मतकट्टे, व्दारा पी. आय. मांटे निवास, पिपल्स बॅंक कॉलनी, जालना : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद :

२ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद : प्रतिवादी

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. बसवराज मतकट्टे (येथून पुढे अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद औरंगाबाद श्री. व्ही. आर. नेटके (येथून पुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद श्री. अरुण दुबे हे हजर होते.

वरील प्रकरणी अपीलार्थी यांनी प्रथम दिनांक ०४-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक अराप-३२०२/प्र.क्र. ४१०/आस्था/९, दिनांक २०-११-२००२ च्या संदर्भात माहिती विचारली आहे. या

माहितीमध्ये त्यांनी सदर पत्र प्राप्त झाले काय ? असल्यास आवक क्रमांक द्यावा, सदर पत्र मिळाल्यास शासनास अहवाल पाठविला आहे का त्याचा जावक क्रमांक द्यावा, अहवाल पाठविला असल्यास अहवालाची सत्यप्रत द्यावी व पाठविला नसल्यास न पाठविण्याची कारणे व कोणत्या तरतुदीपोटी हा अहवाल पाठविला नाही, त्या तरतुदीची माहिती अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती.

सदर माहिती अपीलार्थी यांना कोणत्या स्वरुपात हवी आहे याचा त्यांच्या अर्जामध्ये उल्लेख केलेला नाही. वरील अर्जात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक ७५९ (सर्व शिक्षा अभियान) अन्वये दिनांक १३-११-२००६ रोजी अपीलार्थीस टपालाने पाठवली व त्यासोबत जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाची प्रतही त्याबरोबर जोडली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती वेळेत प्राप्त न झाल्याने अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कडे दिनांक ०७-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपीलार्थीची अपीलाची सुनावणी घेण्याची विनंती जन अपीलीय अधिका-यास दिनांक १५-११-२००६ रोजी प्राप्त झाली परंतु त्या आधीच म्हणजे दिनांक १३-११-२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थीस सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी पाठविली होती. म्हणून प्रथम अपीलीय अधिका-याने प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नसल्याचे अपीलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अपीलीय अधिका-याचे हे उत्तर अमान्य करण्यात येत असून या प्रकरणात अपीलीय अधिका-याने ज्या प्रथम अपीलाची रितसर सुनावणी घेणे आवश्यक होते हे त्यांना सांगण्यात आले.

तथापि प्रथम अपीलामध्ये सुनावणी न घेतल्याच्या कारणावरुन व त्याच बरोबर अपीलार्थीस चुकीची माहिती प्राप्त झाल्याचे व माहिती वेळेवर उपलब्ध झाली नसल्याचे कारण दर्शवून अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या प्रकरणाची पूर्वपिठीका व सद्यस्थिती खाली विषद केली आहे.

सन १९९५ ते  २००० या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या मदतीने औरंगाबाद जिल्हा परिषदे मध्ये जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प या नावाने शैक्षणिक क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी एक प्रकल्प राबविण्यात आला.  या प्रकल्पामध्ये शाळांचे नवीन बांधकाम करणे, विद्यार्थ्याचा गुणविकास करणे, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व गुणवत्ता विकास वाढविणे इत्यादी बाबींचा समावेश होता. हा प्रकल्प राबवित असतांना अनेक नवीन पदांची तात्पुरत्या स्वरुपात निर्मिती करण्यात आली.  या पदापैकी एक पद "अनौपचारिक शिक्षण प्रमुख" (NFC Incharge).  हे होते. या पदावर अपीलार्थी ची दिनांक ०१-०१-१९९७ रोजी करार पध्दतीवर व ठोक वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात आली.  सन २००३ मध्ये सदर प्रकल्प बंद झाला.  अपीलार्थी यांना हा प्रकल्प बंद होण्यापुर्वी  दिनांक  ११-१२-१९९८ रोजी जिल्हा परिषदेकडून कार्यमुक्त  करण्यात आले.  सध्या अपीलार्थी हे श्री. महावीर स्थानक जैनवासी जैन विद्यालय जालना येथे सह शिक्षक या पदावर कार्यरत आहेत.  अपीलार्थी आता, त्यांना या योजने मध्ये ज्या पदावर व ज्या वेतनश्रेणीत ते काम करीत होते त्याच्या समकक्ष पदावर व त्याच वेतन श्रेणीवर शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी जिल्हा परिषदेकडे करत आहेत.  या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय येथे देखील दावे दाखल केले होते.  सदर दाव्यांचा निकाल अपीलार्थीच्या विरुध्द लागला आहे.

अपीलार्थीने मूळ माहितीच्या अर्जात संबोधलेल्या शासनाच्या पत्रास जिल्हा परिषदेने दिलेले उत्तर व या प्रकरणातील शासनाकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत अपीलार्थीस (त्याच्या मूळ अर्जातील विनंतीनुसार) जिल्हा परिषदेने दिनांक १३-११-२००६ रोजी पाठविली होती.  तथापि सदर अहवालातील माहिती ही वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे अपीलार्थीचे म्हणणे आहे.  आज झ ालेल्या युक्तीवादा मध्ये या प्रस्तावा मध्ये ज्या विसंगती आहेत असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे त्या विसंगती दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेस १५ दिवसात योग्य ती सत्य, वस्तुस्थितीदर्शक व सुसंगत माहिती देण्याचे अपिलार्थीने कबूल केले आहे व अर्जदाराकडून सदर सुधारीत माहिती प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या जन माहिती अधिका-याने हा प्रस्ताव अर्जदाराने दुस-यांदा

दिलेली माहिती तपासून,  आवश्यक वाटल्यास, प्रस्ताव सुधारित करुन सुधारित प्रस्तावास आवश्यक ती  माहिती प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठविण्याचे कबूल केले आहे.  यास अपिलार्थी व उत्तरवादी यांची मान्यता  आहे.  या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक    १२ एप्रिल २००७    ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बसवराज विश्वनाथ मतकट्टे, व्दारा पी. आय. मांटे निवास, पिपल्स बॅक कॉलनी, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)  जिल्हा परिषद, औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई  ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १३१/२००७

निर्णय दिनांक १६ एप्रिल २००७

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील, सोनहिरा, मोंढा रोड : अपीलकर्ता
गंगापूर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, :
प्राथमिक आरोग्य केंद्र गाढे पिंपळगाव तालुका
वैजापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य : प्रतिवादी
अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील हे गैरहजर होते. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र गाढे पिंपळगाव तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद श्री. आर. बी. सोनवणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी संबोधण्यात येईल), आणि जन अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे वतीने सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. एस. एम. खान हे हजर होते.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक १८-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" प्राथमिक आरोग्य उप केंद्रात काम करणा-या कर्मचा-यांची नांवे त्यांची मुख्यालये त्या ठिकाणचा पत्ता कायम स्वरुपी, आवश्यक असणा-या औषधांची यादी, त्यांचा स्टॉक कमी असलेल्या औषधांची मागणी अर्ज त्यावरील वरिष्ठ अधिकारी यांचे निर्णय."

वरील माहिती अपीलार्थीने रजिस्टर्ड टपालाने अपेक्षित केली होती. उपरोक्त अर्जामध्ये अर्जदाराने विशिष्ठ कालावधीाचा उल्लेख केला नाही.

अपीलार्थीच्या या मागणीवर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथमतः दिनांक ०५-१२-२००६ रोजी उत्तर दिले आहे. या उत्तरामध्ये जन माहिती अधिका-याने गाढे पिंपळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या एकूण सात कर्मचा-यांची माहिती दिलेली आहे व त्याच बरोबर अपीलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मागणीचे निश्चितपणे आकलन न झाल्यामुळे अपीलार्थीस समक्ष भेटीकरिता बोलाविले होते.

अपीलार्थीच्या वरील मागणीवरुन अपीलार्थीस कर्मचा-याच्या माहिती व्यतिरिक्त इतर कोणती माहिती हवी आहे त्याचा स्पष्ट अर्थबोध होत नाही या जन माहिती अधिकारी यांच्या मताशी आयोग सहमत आहे. सदर माहिती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व मोफत पुरविलेली आहे. अपीलार्थीच्या प्रथम अर्जाव्दारे मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी ने दिनांक १६-१०-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले आहे. अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००६ रोजी या प्रकरणाची सुनावणी ठेवली होती तथापि या सुनावणीस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी हजर राहिले नाहीत असे अपीलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगापुढे स्पष्ट केले.

अपीलार्थी हे प्रथम सुनावणीस हजर झाले नाही तथापि त्यांनी आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी दवाखान्यात कायम

स्वरुपी आवश्यक असणा-या औषधांची यादी, स्टॉक कमी असलेल्या औषधी मागण्याचा अर्ज त्यावर दिनांक ३१-०३-२००६ च्या अखेरची स्थिती याची माहिती मागविली आहे.

आजच्या सुनावणीमध्ये अपीलार्थीस ही संपूर्ण माहिती वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र गाढे पिंपळगाव तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद यांनी दिनांक १२-०४-२००७ रोजी म्हणजे व्दितीय अपिलाची सुनावणीची नोटीस मिळाल्यानंतर कळविली असल्याचे दिसते. सदर माहिती अपीलार्थीस दिनांक १२-०४-२००७ रोजी मिळाल्या प्रित्यर्थची अपीलार्थीची सही (पोहोच पावती) वैद्यकीय अधिकारी यांनी आज आयोगास दाखविली.

आज सुनावणीमध्ये अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आता आपल्या सेवेचा राजीनामा दिला असून राजीनाम्याची मंजुरी प्रतिक्षाधीन आहे. त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी बोलाविलेल्या दिनांक २७-११-२००६ च्या सुनावणीस देखील संबंधित जन माहिती अधिकारी हे गैरहजर राहिले होते. यावरुन जन माहिती अधिकारी यांचा सामान्य नागरिकांना माहिती विहित मुदतीत देण्या संबंधीचा उदासीन दृष्टीकोन प्रतित होतो. अपीलार्थीला त्यांनी प्रथम माहिती दिनांक ०५-१२-२००६ रोजी कळविली. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप (कर्मचा-यांची यादी, मुख्यालये व पत्ते) पाहता ही माहिती अपीलार्थीस तात्काळ कळविणे सहज शक्य आहे. परंतु ही माहिती विहीत मुदतीत जन माहिती अधिका-याकडून दिली गेली नाही एवढेच नव्हे तर अपीलार्थीस ही माहिती देण्यापोटी किती खर्च येईल हे कळविण्याची तसदी देखील जन माहिती अधिका-याने घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या त्यांच्या कार्यालयीन नस्तीवरुन स्पष्ट होते. सदर माहिती कायद्याच्या तरतुदीनसार अपिलार्थीस दिनांक १७-१०-२००६ रोजी अगर तत्पुर्वी देणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. तव्दत आज दिनांक १६-०४-२००७ रोजी आयोगातर्फे घेतल्या जाणा-या सुनावणीच्या तारखेची पुर्वकल्पना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी आर. बी. सोनवणे यांनी दिली होती तथापि आयोगाच्या सुनावणीस देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित

राहिले ही बाब विशेषत्वाने नोंद घेण्यासारखी आहे. आयोगा समोर आपले म्हणणे मांडण्याची संधी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दोन वेळेच्या अनुपस्थितीमुळे वाया घालविली आहे असे आयोगाचे मत झाले आहे. त्यांनी माहिती देण्यासाठी कोणत्याही वैध कारणा शिवाय एकूण ४९ दिवस इतका विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. म्हणून माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) अन्वये जन माहिती अधिका-यास प्रतीदिन २५० रुपये या दराने ४९ दिवसा करिता एकूण १२२५० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, संचालक आरोग्य सेवा मुंबई व सचिव सार्वजनिक आरोग्य सेवा मंत्रालय मुंबई यांनी याची नोंद घ्यावी. तद्वतच अपिलार्थीस आवश्यक माहिती आता मिळाली असल्याने व त्याच्या सुनावणीचे वेळीस गैरहजर असल्यामुळे त्याचे आता या प्रकरणी काही म्हणणे नाही असे अनुमान काढून अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१ माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) अन्वये जन माहिती अधिका-यास प्रतीदिन २५० रुपये या दराने ४९ दिवसा करिता एकूण १२२५० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

२ अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १६ एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

<u>प्रत,</u>

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील, सोनहिरा, मोंढा रोड गंगापूर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र गाढे पिंपळगाव तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

४ जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

५ संचालक आरोग्य सेवा, जी. टी. हॉस्पिटल आवार, छत्रपती शिवाजी रेल्वे स्टेशनला लागून, मुंबई- ४०० ००१

६ सचिव, सार्वजनिक आरोग्य , १ ला मजला मंत्रालय, मुंबई यांनी नोंद घेण्यासाठी.

७ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १३७/२००७

निर्णय दिनांक १८ एप्रिल २००७

| | | |
|---|---|---|
| शेख नविद शेख रशीद, घर क्र. अ/२३८,<br>हर्षनगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता<br>महानगरपालिका औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त<br>महानगरपालिका औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. शेख नविद शेख रशीद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता महानगरपालिका श्री. चंद्रकुमार सोनी (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत. तथापि जन

अपीलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका हे गैरहजर असून त्यांनी शहर अभियंता महा नगरपालिका तथा जन माहिती अधिकारी यांना त्यांचे वतीने हजर राहण्यास प्राधिकृत केले आहे.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक २२-१२-२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " मी दिनांक १३-१२-२००५ रोजी अतिरिक्त शहर अभियंता यांची तक्रार पुराव्यानिशी सादर केली होती. त्यानुसार माननीय आयुक्त यांचे आदेश, आपला चौकशी अहवाल, व सदर प्रकरणात आपल्या विभागामार्फत झालेले सबमिशन व माननीय आयुक्त यांचे आदेश व त्यावर झालेल्या कारवाईचा तपशील मिळण्याबाबत."

सदर माहिती २००५-२००६ या कालावधीतील असून ती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक मनपा/शअ/०९/२००७ दिनांक ०५-०१-२००७ अन्वये असे कळविले की "आपण केंद्रीय माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागविलेल्या माहितीच्या प्रकरणात अंतीम निर्णय झाला नसल्याने आपणास माहिती पुरविता येत नाही."

यावर समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक ०८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपीलार्थीने त्यांची मूळ मागणी कायम ठेवली असून अपील करण्याची कारणे म्हणून, मागणी केलेली माहिती न मिळणे, चुकीचे आदेश व सदरील कायद्यानुसार अर्ज फेटाळते वेळेस कोणत्या नियमान्वये मागणी फेटाळून लावली आहे ते नियम नमूद न करणे, अशी दर्शविली आहेत.

या अपीलाची सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००७ रोजी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती न देण्याचा दिलेला निर्णय कायम ठेऊन अपीलार्थी चे प्रथम अपील फेटाळले आहे. सदर अपीलाचा निर्णय अपीलार्थीस प्राप्त झाला आहे असे अपीलार्थीने आज सुनावणीत कबूल केले.

प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपीलार्थी यांनी अतिरिक्त शहर अभियंता यांचे विरुध्द दिनांक १३-१२-२००५ रोजी पुराव्यानिशी जी तक्रार केली होती. त्या तक्रारी संबंधात झालेल्या चौकशीचा अहवाल व त्या संदर्भात घेण्यात आलेला निर्णय व शहर अभियंता कार्यालयाने या तक्रारी अर्जाच्या संदर्भात केलेल्या निवेदनाची प्रत त्यांना हवी होती तथापि ती त्यांना अद्याप मिळाली नाही. सदर तपशील त्यांना उपलब्ध करुन देण्यासंबंधी महानगरपालिकेचा आदेश घ्यावा असे नमूद केले. महानगरपालिकेतर्फे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदर प्रकरणाची चौकशी त्यांच्या मार्फत होऊन हे प्रकरण अंतीम निर्णयासाठी आयुक्त महानगरपालिका यांचेकडे सादर करण्यात आले आहे. यावर अद्याप अंतीम निर्णय झालेला नसून प्रकरण अंतीम टप्प्यात आहे. त्याच बरोबर यांनी असे प्रतिपादन केले की सदर माहिती आता उघड केल्याने या प्रकरणी घेण्यात येणा-या निर्णय प्रक्रियेमध्ये अडथळे संभवतात.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता महानगरपालिकेतर्फे उपस्थित करण्यात आलेले मुद्दे लक्षात घेणे आयोगास समर्पक वाटते त्याचबरोबर अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या नंतर त्यावर महानगरपालिकेने त्वरेने व एका विशिष्ट कालमर्यादेत कारवाई करणे आवश्यक आहे

हे देखील या ठिकाणी नमूद करण्यात येत आहे. माहिती अधिकार कायदा २००५ च्या तरतुदी कलम ८ (एच) पाहता ही माहिती अपीलार्थीस या टप्प्यावर न देण्याचा महानगरपालिकेचा निर्णय योग्य आहे असे आयोगास वाटते. त्याचप्रमाणे असे आदेशित करण्यात येते की या प्रकरणातील चौकशी संदर्भात महानगरपालिका आयुक्त यांनी ३० दिवसात अंतिम निर्णय घ्यावा व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. संदर्भिय चौकशी प्रकरणी आयुक्त यांनी अंतीम निर्णय एक महिन्याच्या आत घ्यावा व अंतीम अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १८ एप्रिल २००७

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख नविद शेख रशीद, घर क्र. अ/२३८, हर्षनगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १३८/२००७
निर्णय दिनांक १८ एप्रिल २००७

सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन ईनामदार, न्यू : अपीलार्थी
बायजीपुरा, इंदिरानगर, गल्ली नं. ४, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त :
(महसूल) महानगरपालिका औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त : प्रतिवादी
महानगरपालिका औरंगाबाद

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन ईनामदार (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल) महा नगरपालिका औरंगाबाद श्री. ए. बी. आनंदगावकर (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) हजर आहेत. जन अपीलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका हे अनुपस्थित राहिले. त्यांचे वतीने जन माहिती अधिकारी यांना हजर राहण्यास त्यांनी प्राधिकृत केले आहे.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी श्री. सोनी अधीक्षक अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांची शैक्षणिक अर्हता व प्रमाणपत्राबाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित करुन त्यांना कनिष्ठ अभियंता ते उप अभियंता, कार्यकारी अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, शहर अभियंता या प्रत्येक पदावर दिल्या गेलेल्या पदोन्नतीच्या आदेशाच्या प्रती शैक्षणिक अर्हताप्राप्त केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती इत्यादी तपशील हवा होता. अपीलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ६ (१) अन्वये प्रथम दिनांक ०१-१२-२००६ रोजी जन माहिती अधिका-याकडून ही माहिती मागविली आहे.

वरील अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०१-२००७ रोजी अपीलार्थीस सदर माहिती, माहितीच्या अधिकाराचे कलम ८ (त्र) नुसार देता येत नाही असे कळवून अपीलार्थीचे अपील निकाली काढले.

यावर समाधान न झाल्यामुळे दिनांक ०८-०१-२००७ रोजी अपीलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्व्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी त्यांची मूळ मागणी कायम ठेवली व त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याचे कारण त्यांनी दर्शविले आहे.

यावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००७ रोजी अपीलाची सुनावणी घेतली व प्रथम सुनावणी मध्ये अपीलार्थीचे अपील खारीज केले.

यावर व्यथित होऊन अपीलार्थीने दिनांक ०५-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले.

या प्रकरणात आज झालेल्या युक्तीवादामध्ये महानगरपालिकेतर्फे अपीलार्थीने मागणी केलेली माहिती ही श्री. सोनी यांच्या खाजगी बाबीशी संबंधित आहे व ते सर्वात जेष्ठ अधिकारी असून त्यांची ३२ वर्षापेक्षा जास्त कालावधीची सेवा झाली आहे अशा अधिका-या बाबतची माहिती मागणी करणे हे योग्य नाही व अपीलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ८ (त्र) मधील तरतुदीनुसार देता येत नाही हा मुद्दा आयोगासमोर मांडला होता.

अपीलार्थीतर्फे त्यांची मूळ माहितीची मागणी कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अपीलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिका-याने उत्तरे देणे, तदनंतर अपीलार्थीने जन अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील करणे या सर्व प्रक्रियेमध्ये माहिती अधिकार कायदा कलम ११ ची -त्रयस्त पक्षाची माहिती दखल घेतली नसल्याचे दिसून येत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ११ ची दखल घेऊन त्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निर्णय घ्यावा.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १८ एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन ईनामदार, न्यू बायजीपुरा, इंदिरानगर, गल्ली नं.

४, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल) महानगरपालिका औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १३९/२००७

निर्णय दिनांक १९ एप्रिल २००७

| | | |
|---|---|---|
| डॉ. अनिलकुमार जयवंतराव रत्नाळीकर,<br>पशूसंवर्धन विकास अधिकारी, पशू वैद्यकीय<br>दवाखाना पाचोड पोस्ट पाचोड तालुका पैठण<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक पशू<br>संवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा पशू संवर्धन<br>आयुक्त पुणे - ०१ | : | प्रतिवादी |

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी डॉ. अनिलकुमार जयवंतराव रत्नाळीकर, (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक पशू संवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद डॉ. बी. के. जोंधळे, (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व जन अपीलीय अधिकारी तथा पशू संवर्धन आयुक्त पुणे श्री. विजयकुमार (येथून पुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक ०९-१०-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहिती मागविली होती.

" श्री. डोंगरे, श्री. जोशी, श्री. बसमतकर व श्री. हंडे यांच्यावर केलेली कारवाई, कार्यालीन टिपणी सह. "

सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली असून अपेक्षित माहितीचा कालावधी म्हणून त्यांनी त्यांचे दिनांक २१-०९-२००६ चे पत्र हे नमूद केले आहे. अपीलार्थीच्या सदर माहितीच्या अर्जा वर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम दिनांक ०४-११-२००६ रोजी अपीलार्थी यांना हवी असलेली माहिती देण्याप्रित्यर्थ रुपये ३५ इतके शुल्क शासकीय कोषागारात भरण्याविषयी पत्र दिले. सदर पत्रातील सुचनेस अनुसरुन दिनांक १४-११-२००६ रोजी अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये ३५ इतका भरणा, त्यांचे कार्यालयातील पावती क्रमांक ८०८१४७५ अन्वये केला. तदनंतर त्याच दिवशी म्हणजे दिनाक १४-११-२००६ रोजी अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरविण्यात आली. अपीलार्थीने संबंधित माहिती व्यक्तीशः हवी असल्याचे त्यांचे अर्जात स्पष्ट केले होते. अपीलार्थीस दिलेली माहिती पाच पृष्ठांची असल्यामुळे अर्जदारास माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये फक्त दहा रुपये इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांनी आकारणे आवश्यक होते तथापि यांनी २५ रुपये पोस्टाचे शुल्क म्हणून जास्तीचे आकारले व त्या जास्तीच्या शुल्काची रक्कम अपीलार्थी यांना परत हवे असल्याचे अपीलार्थी यांनी सुनावणीमध्ये सांगितले आहे.

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या वरील माहितीवर समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील त्यांनी पोस्टाव्दारे पाठविले असून हे अपील अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक १२/१२/२००६ / १३/१२/२००६ रोजी प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. या प्रकरणी अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००६ रोजी सुनावणी घेतली व आपला निर्णय पारीत केला. सदर निर्णयामध्ये अपीलार्थी यांच्याकडून जास्तीचे टपाल शुल्क आकारण्यात आले ही वस्तुस्थिती अपीलीय अधिकारी यांनी मान्य केली आहे व त्याच बरोबर सदरचे जास्तीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी नजरचुकीने आकारले व सदर रक्कम शासकीय कोषागारातून परत काढणे शक्य नसल्याने अपीलार्थीचा यापुढे माहितीच्या अधिकारात अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावेळी या शुल्काचे समायोजन केले जाईल असे म्हटले आहे.

यावर व्यथित होऊन अपीलार्थी यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले.

या प्रकरणी आज झालेल्या युक्तीवादामध्ये खालील वस्तुस्थिती आयोगा समोर आली. सदर प्रकरणातील अपीलार्थी हे राज्य शासनाच्या पशू संवर्धन खात्यात पशूधन विकास अधिकारी या वर्ग-१ या पदावर कार्यरत आहेत. त्यांना दिनांक २१-०१-२००३ रोजी निलंबीत करण्यात आले व त्यांची पुर्नस्थापना दिनांक १९-०४-२००४ रोजी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे आदेशानुसार करण्यात आली. या निलंबन कालावधीत अपीलार्थी यांना देय असलेले वेतन देण्याशी हे प्रकरण निगडीत आहे. अपीलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी शासनाकडे त्यांना देय असलेल्या पगाराच्या मागणीसाठी केलेला अर्ज संबंधित प्रशासकीय अधिका-याने वेळेवर न पाठविल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला. सदर अर्ज शासनाकडे सरळ पाठविण्याऐवजी वेळोवेळी सदर अर्जामध्ये मुद्दाम त्रुटी शोधून काढून सदर अर्ज शासनाकडे

न पाठविता तो क्षेत्रीय स्तरावर प्रलंबीत ठेवला. अपीलार्थीच्या म्हणण्यावर संबंधित अधिका-याने कोणते शेरे काढले व त्यांचा काय विचार आहे याची विचारणा केल्यावर आयोगास जी कागदपत्रे दाखविण्यात आली यावरुन अपीलार्थीच्या म्हणण्यास पुष्टी मिळते असे आयोगाचे मत आहे. क्षेत्रीय अधिका-याने अपीलार्थीकडे ज्या कागदपत्राची मागणी केली ती कागदपत्रे अपीलार्थीने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे केलेल्या दाव्यासोबतच्या कागदपत्रात उपलब्ध असणे सहज शक्य आहे. तथापि त्याच कागदपत्राची परत अपीलार्थीकडून मागणी करुन येनकेन प्रकारे अपीलार्थीचा अर्ज शासनास लवकर पोहोचू नये यादृष्टीने हे शेरे काढलेले आहेत अशी आयोगाची खात्री झाली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी आणि जन अपीलीय अधिकारी यांना सुचित करण्यात येते की त्यांनी या प्रकरणी अपीलार्थी विषयी सहानुभुतीचा दृष्टीकोन ठेऊन अपीलार्थीचा शासनाकडे पाठविण्याचा प्रस्ताव सर्व शेरे पुर्तता करुन अपिलार्थीकडून दुरुस्त प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, १५ दिवसाचे आत तो शासनाकडे पाठवावा. तसेच अपीलार्थीस आकारलेले जादा शुल्क रुपये २५ हे सात दिवसाचे आत त्यांना परत करावे.

## निर्णय

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस आकारलेले जादा शुल्क रुपये २५ (रुपये पंचवीस फक्त) त्यांना सात दिवसाचे आत परत करावे.

औरंगाबाद

दिनांक १९ एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ डॉ. अनिलकुमार जयवंतराव रत्नाळीकर, पशूसंवर्धन विकास अधिकारी, पशू वैद्यकीय दवाखाना पाचोड पोस्ट पाचोड तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक पशू संवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद यांना वरील प्रमाणे नोंद घेण्यासाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पशू संवर्धन आयुक्त पुणे - ०१ यांना वरील प्रमाणे नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १२८/२००७
निर्णय दिनांक १९ एप्रिल २००७

राणा गुलाबसिंह नरहारीराव सोळंकी, रा. टेभुर्णी : अपीलार्थी
पोस्ट तालुका अहमदपूर जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता ल. पा. :
(जि. प.) पाणीपुरवठा उपविभाग, अहमदपूर
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी : प्रतिवादी
अभियंता ल. पा. (जि. प.) पाणीपुरवठा जिल्हा
परिषद, लातूर

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोळंकी रा. टेभुर्णी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता ल. पा. (जि. प.)

पाणीपुरवठा उपविभाग, अहमदपूर जिल्हा लातूर श्री. ए. पी. चाटे (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ल. पा. (जि. प.) पाणीपुरवठा जिल्हा परिषद, लातूर श्री. व्ही. बी. सगरे (येथून पुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी दोन वेगवेगळया अर्जाव्दारे अनुक्रमे दिनांक १४-०८-२००६ आणि २९-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दोन वेगवेगळे अर्ज करुन खालील प्रमाणे माहिती मागविली.

१. मौजे टेभुर्णी येथे पाणीपुरवठा पाईलपलाईन व कट्टा टाक्या दोनच्या अंदाजपत्रकाची नक्कल फोटो प्रत व श्री. कुलकर्णी शाखा अभियंता यांनी दिलेल्या रिपोर्टची फोटो प्रत व अंदाजपत्रक व रिपोर्टच्या चौकशीसंबंधी.

२. मौजे टेभुर्णी तालुका अहमदपूर येथील अर्जदाराने दिलेल्या तक्रारी अर्जाची चौकशी संपूर्ण अहवालाची फोटो प्रत नक्कल व समाजकल्याण विभागामार्फत केलेल्या कामाच्या बाबतची एम.बी.ची फोटोप्रत नक्कल.

अर्जदाराने मागितलेली वरील माहिती पाहता कोणताही स्पष्ट अर्थबोध होत नाही तथापि मौजे टेभुर्णी तालुका अहमदपूर येथे समाजकल्याण खात्यामार्फत करण्यात आलेल्या पाईपलाईन च्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रक याच्या प्रती या संदर्भात अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या चौकशी अहवालाच्या प्रती, श्री. कुलकर्णी शाखा अभियंता यांनी दिलेल्या अहवाल झेरॉक्स प्रत अपीलार्थीस अपेक्षित आहेत असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

अपीलार्थीच्या सदर अर्जावर अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिल्याचे उपलब्ध कागदपत्रा वरुन दिसून येत नाही.

कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ३०-०६-२००६ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपील करण्यासाठी कारण म्हणजे वेळेत

माहिती प्राप्त न झाल्यामुळे असे दर्शविले आहे. जन अपीलीय अधिकारी यांना सादर केलेल्या प्रथम अपीलामध्ये अपीलार्थीने अदांजपत्रक, चौकशी अहवाल, व एम. बी. ची झेरॉक्स प्रत ची मागणी केली आहे व त्याच बरोबर समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आलेल्या कामाची माहिती मागविलेली आहे. अपीलार्थीने मूळ अर्जात केलेल्या माहिती पेक्षा ही माहिती जास्त आहे. अपीलार्थीने दिनांक ३०-१०-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील केल्यानंतर त्याची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी घेतल्याचे दिसून येत नाही. जन अपीलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून त्यांनी जन माहिती अधिकारी व अपीलार्थी या दोघांना बोलावून घेऊल अपीलार्थीने केलेल्या प्रथम अपीला संदर्भात ठोस निर्णय देणे माहिती अधिकार कायदा २००५ व्दारे अभिप्रेत आहे हे त्यांना आज सुनावणीमध्ये स्पष्ट करण्यात आले.

कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचे दिनांक ०७-११-२००६ च्या पत्रान्वये सदर माहिती संदर्भातील सर्व रेकॉर्ड पंचायत समिती अहमदपूर यांच्याकडे असल्याने गट विकास अधिकारी पंचायत समिती अहमदपूर यांच्याकडे संपर्क साधण्याचे सुचित केले. या ठिकाणी असे नमूद करण्यात येते की, अपीलीय अधिकारी यांचे दिनांक ०७-११-२००६ चे पत्रावर कोणताही जावक क्रमांक नाही व सदर पत्र अपीलार्थीस मिळाले नसल्याचे अपीलार्थी हे आज सुनावणीमध्ये सांगत आहे. यावरुन या पत्राच्या वैधतेबाबत शंका घेण्यास भरपूर वाव राहतो. वरील पत्रव्यवहार नंतर अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जिपला/लपावि/कार्या-६/सीआर-२७/०६, दिनांक ०९-०१-२००७ च्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी उपविभाग जि. प. अहमदपूर व गटविकास अधिकारी पंचायत समिती अहमदपूर यांना अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्या संदर्भात सूचना दिल्याचे दिसते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी त्यांच्या माहिती न देण्याच्या भुमिकेचे फारसे समर्थन देऊ शकले नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अपीलार्थी यांनी ज्या कामाची माहिती मागविली आहे ते काम समाजकल्याण खात्याच्या निधीमधून, समाजकल्याण खात्याच्या प्रशासकीय मान्यतेनंतर हाती घेण्यात येते. प्रत्यक्षात या कामाचे कार्यारंभ आदेश गट विकास

अधिकारी  हे देत असतात व हे काम प्रत्यक्षात ग्रामपंचायती मार्फत केले जाते व त्या करिता तांत्रिक मार्गदर्शन संबंधित कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचे तर्फे दिले जाते.  काम पूर्ण झाल्या नंतर कामाचे मुल्यमापन उप अभियंता हे करतात व तदनंतर या मुल्यमापनावर आधारीत कामाची देयके गट विकास अधिकारी पंचायत समिती हे अदा करतात.  अशा प्रकारची  पध्दत या कामामध्ये अवलंबिली गेली असल्यामुळे या कामाची मोजणी पुस्तिका व अंदाजपत्रकाच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत.  या अंदाजपत्रकाच्या व मोजणी पुस्तिकाच्या प्रती गट विकास अधिकारी  पंचायत समिती अहमदपूर यांच्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणामध्ये कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभागाने दिनांक ०९-०१-२००७ च्या पत्राव्दारे सूचना करुनही गट विकास अधिकारी पंचायत समिती अहमदपूर यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणी पर्यत कोणतीही कार्यवाही  केली नाही, याची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी गांभीर्यपूर्वक नोंद घेऊन संबंधित गट विकास अधिका-यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी अशी आयोगाची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांना शिफारस आहे.  तव्दतच अपीलार्थीने त्यांच्या उपरोलिखीत अर्जामध्ये मागणी केलेली माहिती अर्जदार यांना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी हे आदेश प्रस्तुत  झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी व अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा असे आदेशित करण्यात येत आहे.  या प्रकरणातील एकूण सर्व घडामोडी पाहता जन माहिती अधिकारी यांनी आपली भूमिका व्यवस्थितपणे बजावली नसल्याचे या ठिकाणी स्पष्ट होते.  जर त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नव्हती तर त्यांनी त्याप्रमाणे अपीलार्थीस तात्काळ कळविणे आवश्यक होते तथापि त्यांनी तसे केले नाही ही त्यांची कृती त्यांचा बेजबाबदारपणा व बेफिकीरी स्पष्ट करते.  त्यांनी दाखविलेले या वृत्तीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी असेही पुढे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी न घेता साध्या पत्राने अपीलार्थीस उशीरा मार्गदर्शन करणे ही त्यांची कृती देखील त्यांच्या बेजबाबदारपणाचे दर्शन घडवते त्यांच्या या वर्तनाची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी यथायोग्य नोंद घ्यावी.

## निर्णय

१. अपील मान्य.

२. अपीलार्थीस मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी त्यांचे दिनांक १४-०८-२००६ व २९-०८-२००६ या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्रस्तुत झाल्यानंतर सात दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी आणि गट विकास अधिकारी अहमदपूर यांनी अपीलार्थीस वेळेत माहिती पुरविण्याबाबत केलेल्या हलगर्जीपणा बद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद

दिनांक १९ एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोळंकी, रा. टेभुर्णी पोस्ट तालुका अहमदपूर जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता ल. पा. (जि. प.) पाणीपुरवठा उपविभाग, अहमदपूर जिल्हा लातूर

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ल. पा. (जि. प.) पाणीपुरवठा जिल्हा परिषद, लातूर

३ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांना नोंदी व कार्यवाही संदर्भात

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपिल/सीआर/१४१/०७

निर्णय दिनांक २० एप्रिल २००७

सौ. लताबाई बाबुराव व्यवहारे, जैन गल्ली, : अपीलार्थी
कळमनुरी, तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली
सदस्य शहर दक्षता समिती कळमनुरी तालुका
कळमनुरी जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार :
कळमनुरी जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय : प्रतिवादी
अधिकारी हिंगोली जिल्हा हिंगोली

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी स्वतः श्रीमती लताबाई बाबुराव व्यवहारे, कळमनुरी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी श्री.

डी. व्ही. पवार (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली श्री. प्रकाश पिरतवाड (येथून पुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक २२-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली होती.

" कळमनुरी शहरातील किरकोळ केरोसीन विक्रेते त्यांच्या कार्डधारकांना केरोसीन नियमानुसार वाटप करत नाही अशी तक्रार त्या कार्डधारकांनी केलेली आहे. त्याच बरोबर दुकानात भाव फलक, केरोसीनचा दर व कार्डधारक संख्या लिटर प्रमाणे माहिती मिळू शकली नाही. त्यांच्याकडे स्टॉक बुक, वाटप रजिस्टर आढळून आले नाही. "

सदर माहिती अर्जामध्ये अपीलार्थीने कोणताही कालावधी निश्चित केला नाही. अपीलार्थीच्या वरील माहितीच्या अर्जावरुन अर्जदारास निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे त्याचाच स्पष्ट बोध होत नाही. तथापि अपीलार्थीने कळमनुरी शहरातील स्वस्त धान्य दुकानास तालुका दक्षता समितीच्या सदस्या या नात्याने भेट दिली असता त्यांच्या भेटीत त्यांना जे आढळले त्याची टिपणी त्यांनी माहितीच्या अर्जामध्ये दिली आहे. दक्षता समिती सदस्य म्हणून अपीलार्थी यांना अशा प्रकारे स्वस्त धान्य दुकानांना भेटीचा अधिकार नाही असे उपविभागीय अधिकारी हिंगोली यांनी स्पष्ट केले.

अपीलार्थीच्या वरील माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतेही उत्तर दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागद पत्रावरुन दिसून येते नाही व ही वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणी मध्ये मान्य केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा खुलासा प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपीलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील म्हणून, " सर्वासाठी कळमनुरी शहरातील किरकोळ केरोसीन विक्रेत्यांची नियमानुसार चौकशी करणे, तहसीलदार कार्यालयात तक्रार केली असता त्यांनी कोणतीही लेखी माहिती आज पावेतो न दिल्याबाबत तसेच शहर दक्षता समिती कळमनुरी सदस्य या नात्याने केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेतल्याबाबत " असा दिला आहे. माहिती संबंधित विषय म्हणून त्यांनी, " शहर दक्षता समिती या नात्याने स्वस्त धान्य दुकानदार वसंताबाई सारडा परवाना क्रमांक ०९/९४ यांचे स्वस्त धान्य दुकान व शहर दक्षता समिती या नात्याने स्वस्त धान्य दुकानदार श्री. सुभाषसिंग वर्मा परवाना क्रमांक १३/९५ यांना माहे जून जुलै व ऑगस्ट २००६ या महिन्याचे केरोसीन वाटपात प्रचंड अनियमितता दिसून आलेली आहे, याबाबत तहसील कार्यालयात केलेल्या तक्रारी अर्जास तहसीलदार यांनी कोणतेही उत्तर न दिलेबाबत, " असे विषय मांडले आहेत.

अपीलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१०-२००६ रोजी सुनावणी घेतली व अपीलार्थीचे अपील निकाली काढले. संबंधित सुनावणीमध्ये अपीलार्थी यांनी त्यांना जून जुलै ऑगस्ट २००६ च्या केरोसीन वाटपाच्या व नियतनाच्या आदेश प्रती मिळाल्या नाहीत अशी तक्रार केली होती त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणी तहसीलदार यांना दोन दिवसामध्ये नियतन आदेश प्रती देण्याबाबत आदेश दिले होते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी कळमनुरी शहर दक्षता समितीच्या सदस्या आहेत. सदर दक्षता समितीची स्थापना शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागा मार्फत झाली आहे. या समितीची कार्यप्रणाली अशी आहे की नागरिकाकडून

अन्नधान्य / रॉकेल वाटप करतेवेळेस जनतेकडून ज्या तक्रारी प्राप्त होत असतात त्या, या समितीचे अध्यक्ष यांच्या निदर्शनास आणून समितीच्या अध्यक्षांनी, त्याप्रमाणे संबंधित तहसीलदारानां चौकशीचे आदेश द्यावयाचे आहेत व दुकानदारावर योग्य ती पुढील कारवाई करावयाची आहे. या समितीचे अध्यक्ष स्थानिक विधानसभा / विधान परिषद सदस्य हे आहेत. या प्रकरणामध्ये अपीलार्थी यांनी स्वत: होवून स्वस्त धान्य दुकानाची तपासणी करुन त्यावेळी त्यांना आढळून आलेल्या त्रुटी तहसीलदार कळमनुरी यांचे निदर्शनास आणल्या आहेत. या समितीच्या बैठका नियमितपणे होत नसल्याने या तक्रारी अपिलार्थीने सरळ तहसिलदार यांच्या निदर्शनास आणल्या आहेत असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये आयोगाच्या निदर्शनास आणले.

अपीलार्थी माहितीच्या मागणीचा विषय व स्वरुप हे वेळोवेळी बदलत आहेत तथापि त्यांना कळमनुरी शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानदाराकडे किती रॉकेल व धान्य प्राप्त झाले व त्यापैकी त्यांनी कितीचे वाटप केले त्याची माहिती हवी असल्याचे त्यांच्या आजच्या युक्तीवादावरुन दिसून येते. ही माहिती अपीलार्थीस जून जुलै ऑगस्ट २००६ या कालावधीची हवी असल्याचे त्यांनी आज प्रतिपादन केले. अपीलार्थीने मुळ अर्जात उल्लेख केलेले विषय व अपील अर्जात उल्लेख केलेले विषय हे दोन्ही विषय सकृतदर्शनी जरी भिन्न वाटत असले तरी अपीलार्थीस कळमनुरी शहरातील केरोसीन वाटपाबाबत जून जुलै व ऑगस्ट २००६ या कालावधीतील माहिती हवी असावी असे अनुमान यावरुन निघते. अपीलार्थीस त्यांची मागणी कोठेहि नीटपणे मांडता आलेली नाही हे दिसते. तथापि सदर माहिती अपीलार्थीस आठ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या माहिती प्रित्यर्थ आवश्यक त्या रकमेचा भरणा केल्यानंतर आठ दिवसाचे आत अपीलार्थीस वरील प्रमाणे आवश्यक असलेली सर्व माहिती पुरवावी. या प्रकरणात असे आढळून आले आहे की जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: अपिलार्थीने यांच्याकडे केलेल्या अर्जावरुन, अपीलार्थीस निश्चितपणे काय माहिती हवी होती

याचा स्पष्ट बोध होत नसल्याने, या अपीलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी योग्य ते उत्तर देवून अपीलार्थीस कोणती माहिती अपेक्षित आहे हे शोधणे गरजेचे होते तथापि त्यांनी असे काही केल्याचे दिसून येत नाही. नागरिकांना माहिती देण्या संदर्भात त्यांनी दाखविलेल्या उदासीनतेबाबत याबाबत त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे व अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २० एप्रिल २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ सौ. लताबाई बाबुराव व्यवहारे, जैन गल्ली, कळमनुरी, तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली सदस्य शहर दक्षता समिती कळमनुरी तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी जिल्हा हिंगोली

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/रामाआ/१११**
निर्णय दिनांक- ०५ एप्रिल, २००७.

१. श्री.प्रभाकर प्रेमदास शेवलेकर **--अपिलकर्ता**
मेडीकल क्वॉर्टर, बी/१/९
औरंगाबाद.

विरुध्द

**१.** जन माहिती अधिकारी तथा **-- उत्तरवादी.**
अधीक्षक,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, औरंगाबाद.

२. अपिलिय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
रुग्णालय, औरंगाबाद.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५ एप्रिल, २००७ रोजी औरंगाबाद येथे ठेवण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. प्रभाकर प्रेमदास शेवलेकर ( येथून पुढे अर्जदार असे संबोधले जाईल.) जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

रुग्णालय, औरंगाबाद, डॉ. आर.एम.कादरी (येथून पुढे जनमाहिती अधिकारी संबोधले जाईल.) , अपिलिय अधिकारी तथा अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद, डॉ.आनंद मलिक (येथून पुढे अपिलिय अधिकारी संबोधले जाईल.) हे हजर आहेत.

प्राचार्य, नर्सिग स्कुल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, औरंगाबाद हे या प्रकरणात जनमाहिती अधिकारी नाहीत. रुग्णालयाच्या सर्व प्रशासकीय बाबी करिता वैद्यकीय अधिक्षक, हे जनमाहिती अधिकारी आहेत, असे सुनावणीमध्ये अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद तसेच अधिष्ठाता यांनी सांगितले आहे यामुळे यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिण्यात येत आहे.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी, यांचेकडे दिनांक- ०४ ऑक्टोंबर, २००६ रोजी प्रथम अर्ज केला.

अर्जामध्ये अर्जदाराने खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" सुनीता देशमूख यांच्या आत्महत्या प्रकरणी ही माहिती आहे."

चौकशी समितीचा अहवाल, पंचनाम्याची प्रत, लवकरच अहवाल मिळणे, मयत सुनीता बबनराव देशमूख हिने दिनांक- १५ मे, २००३ रोजी केलेल्या आत्महत्या संदर्भात केलेल्या चौकशी समितीचा अहवाल, तसेच पंचनामा प्रत मिळणे बाबत."

त्याच बरोबर अधिक्षीका, शुश्रूषा सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे दिनांक- १०-१०-२००६ रोजी या प्रकरणी अर्जदाराने दुसरा अर्ज केला आहे. महाविद्यालयाच्या प्रशासनामध्ये अधिक्षिका, सुश्रूषा सेवा संचालनालय, मुंबई यांचा सहभाग नसल्याने व त्यांना जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित केले गेले नसल्यामूळे त्याचबरोबर अर्जदाराने त्यांचा दिनांक- १०-१०-२००६ च्या माहितीच्या अर्जा अन्वये या प्रकरणामध्ये असलेल्या दोषी व्यक्तीवर गुन्हा का नोंदविले

नाही. श्रीमती सुनिता देशमूखाच्या कुटूंबाची झालेल्या नुकसानी बाबत काय केले. अशा अर्थाचे प्रश्न विचारले आहेत. या प्रार्श्वभुमीवर अर्जदाराचा फक्त दिनांक- ०४ ऑक्टोंबर, २००६ रोजीच्या जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने प्रथम केलेला अर्ज आजच्या सुनावणीमध्ये विचारात घेण्यात येत आहे.

अर्जदाराने मूळ अर्जात स्पष्टपणे कोणतीही मागणी केली नाही तथापि अर्जदाराच्या वरील मागणीमध्ये मयत सुनीता बबनराव देशमूख हिने दिनांक- १५ मे, २००३ रोजी केलेल्या आत्महत्या प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल व पंचनाम्याची प्रत अर्जदारास हवी असल्याचे स्पष्ट होते व त्याप्रमाणे अर्जदाराने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे

सदर माहिती अर्जदाराने टपालाव्दारे अपेक्षिली होती. माहितीचा कालावधी अर्जदाराने त्या अर्जात नमूद केला नाही. या अर्जामध्ये अर्जदाराने वरील प्रकरणास तीन वर्षे पूर्ण झाली असून त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही पूर्ण केली नाही, असे वाक्य लिहिले आहे. आज झालेल्या सुनावणीमध्ये चौकशी समितीत सापडलेल्या दोषी व्यक्तीवर काय कार्यवाही केली, याची अर्जदारास माहिती हवी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अर्जदाराच्या दिनांक- ०४-१०-२००६ रोजीच्या अर्जावर माहिती अधिकारी यांनी दिनांक- १० ऑक्टोंबर, २००६ रोजी त्यांचेकडील पत्र क्रमांक- १३०५१ अन्वये अर्जदारास सदर माहिती देण्यापोटी येणारा खर्च म्हणून १०/- रुपये वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करणे विषयी लिहीले व त्या प्रमाणे अर्जदाराने दिनांक- १२--१०-२००६ रोजी १०/- रुपये शासकीय तिजोरीत जमा करुन (पावती क्रमांक- ३७८९५३९) माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध माहिती प्राप्त करुन घेतली. अर्जदारास पंचनाम्याची प्रत व चौकशी अहवालाची प्रत हवी होती.

तथापि अर्जदारास दिनांक- १२-१०-२००६ रोजी फक्त सी.एम.ओ. यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत प्राप्त झाली.

सदर माहितीवर समाधान न झाल्यामूळे दिनांक- ०४-११-२००६ रोजी अपिलिय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले. यावर अपिलिय अधिकारी यांनी कोणतीहि सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- १४८४८, दिनांक- २९ नोव्हेंबर, २००६ रोजीच्या पत्रा अन्वये १२ रुपये इतके शुल्क शासकीय तिजोरीत भरण्या सांगितले व त्या प्रमाणे अर्जदाराने दिनांक- २९-११-२००६ रोजी शासकीय तिजोरीत १२/- रुपये ( पावती क्रमांक ३६८९५५५) अन्वये भरुन अर्जदारास आवश्यक असलेल्या चौकशी अहवालाची प्रत अर्जदाराने प्राप्त करुन घेतली. सदर अहवालाची पोंच मिळाल्या प्रित्यर्थ अर्जदाराने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद यांचे उपरोक्त क्रमांकाचे पत्रावर सही करुन पोंच दिली आहे. अपिलिय अधिका-याची अपिल ठरविण्याची ही कृती चुकिची असून सुनावणी करिता त्यांचेकडे अपिल प्राप्त झाल्यानंतर दोन्ही बाजूच्या पक्षकारांना बोलावून, त्यांचे म्हणणे / युक्तिवाद ऐकून लेखी निर्णय निर्गमित करणे अभिप्रेत असल्याचे अपिलीय अधिका-यांना आयोगातर्फे आज सूचित करण्यात आले

तथापि यावरहि अर्जदाराचे समाधान न झाल्यामूळे अर्जदाराने व्यथीत होवून दिनांक- २३-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये अर्जदाराने संबंधित प्राधिकरणाने चूकीचा अहवाल देवून दिशाभूल केली आहे. असा आरोप केलेला आहे व त्याच बरोबर अधिसेविका श्रीमती रंजना पाराशर, श्रीमती आशा सोनवणे, व श्रीमती रश्मी बुरबुरे यांच्यावर गुन्हा दाखल न केल्या बाबत माहितीची विचारणा केली आहे व संबंधित अधिपरिचारीका व अधिसेविका यांच्यावर गुन्हा दाखल करुन

नुकसान भरपाई मिळणे बाबत विनंती केली आहे. या अपिलामध्ये अर्जदाराने मूळ अर्जात केलेली मागणी सोडून इतर विनंत्या केल्या आहेत, हे येथे लक्षात घ्यावे लागेल

या प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, अर्जदार हे प्रशिक्षणार्थी मयत श्रीमती सुनिता बबनराव देशमूख यांचे मामा असून या प्रशिक्षणार्थी परिचारीकेने दिनांक- १५- मे, २००३ रोजी प्रशिक्षणार्थी वस्तीगृहात आत्महत्या केली. ही आत्महत्या आहे की, पूर्वनियोजित कटातून केलेला खून आहे. या संदर्भात अर्जदारास न्यायालयामध्ये त्यांचा दावा मांडण्यासाठी उपरोक्त कागदपत्राची आवश्यकता आहे. आजच्या सुनावणीमध्ये अर्जदाराने पोलीस पंचनाम्याच्या प्रतीची देखिल मागणी केली ( अर्जदाराने केलेल्या मूळ अर्जामध्ये त्यांना सी एम ओ ने केलेला पंचनामा की पोलीस पंचनामा हवा आहे, याचा उल्लेख नाही. )

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, या प्रकारे अर्जदारास माहिती देण्यासाठी संबंधित प्राधिकरणाने टाळाटाळ व दिशाभूल केली. त्यावरुन अर्जदारा पासून काही माहिती दडविली जात असल्याचाा अर्जदाराचा दृढसमज झाला आहे. असे सुनावणी मध्ये स्पष्ट झाले.

आज रोजीच्या झालेल्या युक्तिवादा नंतर असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी अर्जदारास या प्रकरणातील सर्व नस्त्या पुढील सात दिवसात अर्जदाराकडून तशी लेखी विनंती प्राप्त झाल्या नंतर पाहण्यासाठी तात्काळ उपलब्ध करुन द्याव्यात. त्याच बरोबर महाविद्यालयाकडे या प्रकरणातील पोलीस पंचनाम्याची प्रत उपलब्ध असल्यास ती देखील अर्जदारास याच कालावधीमध्ये विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

अर्जदाराची पुढील मागणी चौकशी अहवालातील निष्कर्ष व शिफारशीच्या अंमलबजावणी संदर्भात आहे, त्याकरिता अर्जदाराने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत

महाविद्यालय व रुग्णालय ईमारत, सेन्ट जार्जेस हॉस्पिटल परिसर, मुंबई-१ तसेच जन माहिती अधिकारी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई -३२, यांचेकडे या संदर्भात माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये वेगळा अर्ज करावा व संचालक वैद्यकीय शिक्षण, मुंबई व जन माहिती अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्रालय, मुंबई यांनी या प्रकरणी अर्जदाराने केलेल्या अशा प्रकारच्या अर्जाची प्राथम्याने दाखल घेंवून अर्जदाराने सदर अर्ज केल्या पासून ३० दिवसाच्या आत त्यांना माहिती पुरविण्यात यावी. असे त्यांना निर्देशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अर्जदाराने लेखी विनंती केल्यास या प्रकरणातील सर्व नस्त्या अर्जदारास सात दिवसाच्या आत अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद यांनी तपासणीसाठी दाखविण्यात याव्यात व त्यास हवी असलेली पोलीस पंचनाम्याची प्रत त्यांचेकडे उपलब्ध असल्यास विनामुल्य पुरविण्यात यावी.

३. संचालक, वैद्यकीय शिक्षण, / जनमाहिती अधिकरी, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी या प्रकरणी त्यांचेकडे अर्जदाराने अर्ज केल्यास त्यांना प्रकरणातील हवी असलेली माहिती प्राधान्याने व ३० दिवसांच्या आत द्यावी.

औरंगाबाद, दिनांक- ०५ एप्रिल, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार श्री. प्रभाकर प्रेमदास शेवलेकर, राहणार-मेडीकल क्वार्टर, बी/१/९, औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन चौथा माळा, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय ईमारत, सेन्ट जार्जेस हॉस्पिटल परिसर, मुंबई-१ मुंबई. यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. प्रधान सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/११५/रामाआ/औ'बाद.
निर्णय दिनांक- ०९ एप्रिल, २००७.

श्री.दत्तात्रय पंडीतराव काळे --अपिलकर्ता.
छत्रपती चौक, पुंडलीकनगर,
औरंगाबाद.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी.
नायब तहसीलदार, लातूर.

२. अपिलिय अधिकारी तथा
तहसीलदार, लातूर.

**-विवेचन-**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०९ एप्रिल, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.दत्तात्रय पडीतराव काळे (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल) व जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, लातूर (येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) सौ.एस.एस.औसेकर, हे हजर आहेत. तर अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने प्रथमतः दिनांक- ११-०२-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील पमाणे माहिती मागविली आहे.

"सन १९७० ते २००६ या कालावधीत लातूर शहर व लातूर तालुका परिसरात (१) श्री.विक्रमसिंग दतूसिंग चौव्हाण (२) सौ.ललीता वि.चौव्हाण वि.चौव्हाण (२) श्री.महेंद्रसिंग वि.चौव्हाण (३) श्री.धर्मेद्रसिंग वि.चौव्हाण (४) श्री.जितेंद्रसिंग वि.चौव्हाण यांच्या सर्वाच्या नावे किंवा या सर्वापैकी एकांच्या नांवे खरेदी केलेल्या जमिनीच्या फेरफाराच्या नकला मिळणे बाबत."

सदर माहितीचा कालावधी सन १९७० ते २००६ इतका ३६ वर्षाचाअसून सदर माहिती अर्जदाराने टपाला व्दारे अपेक्षिली आहे. अर्जदारास १९७० ते २००६ हया कालावधीत लातूर शहर व लातूर परिसरातील शेतीच्या फेरफारा संबंधी  नकला हव्या असल्याचे त्यांनी सांगितले. परिसर याचा अर्थ लातूर तालुक्यातील सर्व जमिनीचे फेरफाराच्या नकला अर्जदारास हव्या असल्याचे अर्जदाराने आज सुनावणीमध्ये स्पष्ट केले. अर्जदाराच्या या माहितीवर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक-२००६- मा.आ. कावि-५२, दिनांक- ०६-११-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये ( एकूण १२ पृष्ठे ) ची माहिती अर्जदारास दिली आहे.

सदर माहिती देण्या करिता जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराकडून कोणतेही शुल्क आकारल्याचे दिसत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेली माहिती अपूरी वाटल्याचे कारणावरुन त्यांनी प्रथम अपिल जनअपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक- १७-१०-२००६ रोजी केले.

सदर अपिलामध्ये अर्जदाराने आपल्या मूळ अर्जातील मागणी कायम ठेवली व अपिल करण्याचे कारण, प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी व असमाधानकारक असल्याचे दिले आहे. या अपिलाची सुनावणी अपिलिय अधिकारी यांनी घेतली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

प्रथम अपिलाची सुनावणी न झाल्यामूळे अर्जदाराने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २७-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले.

उपलब्ध कागदपत्रांची पहाणी करता अर्जदाराने मागितलेली माहिती त्रयस्त व्यक्तीच्या संदर्भात असल्यामूळे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ११ अन्वये जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. म्हणून असे आदेशित करण्यात येते की, प्रथम अपिलिय अधिकारी यांनी प्रथमतः माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी नूसार या अर्जाची पंधरा दिवसाचे आत सुनावणी घ्यावी. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात आले आहे.

२. अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदाराने दिलेल्या अर्जाची पंधरा दिवसाचे आत (दिनांक- २४-०४-२००७ पूर्वी) सुनावणी घ्यावी.

औरंगाबाद, दिनांक- ०९ एप्रिल, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार श्री.दत्तात्रय पंडीतराव काळे, काळेभुवन-२३/११, पापविनाश रोड, महावीर चौक,लातूर.
जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, लातूर तहसील कार्यालय, लातूर.

२. अपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर, यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

४. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक   १२५-२००७-रामाआ-औ'बाद.

निर्णय दिनांक   १२ एप्रिल २००७

१ श्री. गोपाळ तुकारामपंत देव, : अपीलार्थी
केळी बाजार, सुपारी हनुमान रोड,
कामधेनू कॉर्नर समोर,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :
तहसीलदार, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय : प्रतिवादी
अधिकारी, औरंगाबाद.

**विवेचन**

वरील प्रकरणात आज दिनांक १२-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गोपाळ तुकारामपंत देव, (यापुढे त्यांना अपीलार्थी संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, श्रीमती अपर्णा सोमाणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी संबोधण्यात येईल), आणि जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद श्री.अे.एम.शिंदे (यापुढे त्यांना अपिलिय अधिकारी संबोधण्यात येईल), हे हजर होते.

वरील प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- ०७-१२-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितली होती व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेले काही अहवाल पहाणीसाठीची मागणी खालील प्रमाणे केली होती.

" १) सर्वे नंबर ८३ व ९१ चा सिटी सर्वे झाला की नाही व झालेला असल्यास किती क्षेत्राचा या बाबत खुलासा आपण नगर भुमापन अधिकारी यांना दिनांक- १२-१-०६ रोजी जा.क्र. ०६/जमा/२/ कावि या पत्रानुसार मागवलेला आहे. नगर भुमापन कार्यालयाने क.प.भु-२/ बा.क्र./३३७/०६, दिनांक- २७-४-०६ ला पाठविलेल्या उत्तरा सोबत सिटी सर्वे नंबर, शिटनंबर व पी.आर.कार्ड सादर केले आहेत. सिटी सर्वे झालेले क्षेत्र वजा जाता शिल्लक राहीलेल्या जमीनीचे क्षेत्र व नकाशा दाखवण्यात यावा व त्यानुसार तयार केलेले ७/१२ मला देण्यात यावा.

२) दिनांक २९-५-०६ रोजी क्र. २००६/जमा/२/कावी- या पत्राव्दारे नगर भुमापन अधिकारी यांना सर्वे नंबर ८३ व ९१ मधिल किती क्षेत्राचे हद्दीपर्यंत सी. टी. एस. झालेला आहे. त्याबाबत नकाशाच्या प्रतीसह आपणास अहवाल सादर करावा असे म्हटले आहे. त्यानुसार नगर भुमापन कार्यालयाने पाठविलेला अहवाल व नकाशा आणी त्यावर आपण केलेली कारवाई मला वाचण्यासाठी दाखवण्यात यावा. तसेच नगर भुमापन कार्यालयाच्या अहवालाची झेरॉक्स प्रत व आपण त्यावर केलेल्या कारवाईची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

३) नगर भुमापन कार्यालयाच्या २७-४-०६ च्या पत्रानुसार सवे नंबर ९१ पैकीचा भाग न.भु.क्र. १७८४९ व सर्वे नं. ८३ पैकी १७८५० या दोन सिटी सर्वे नंबरच्या

पी.आर.कार्डवर " शेतीकडे " असे लिहीले आहे. बोकीच्या २६ पी.आर.कार्डवर ' अ 'म्हणजे अकृषी असे लिहीले आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा. "

अर्जदाराने मागणी केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता काही माहिती अर्जदार यांनी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असून काही मुद्यावर त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा विचारल्याचे दिसून येते. अशा प्रकरणाचे खुलासे अपेक्षित करणारी माहिती अपिलार्थीने करणे या कायद्या अन्वये अभिप्रेत नाही, असे अपिलार्थीना सांगण्यात आले.

अपिलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनाक- ०४ जानेवारी, २००७ रोजी प्रथम उत्तर दिले.

तथापि या उत्तरावर अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक- १० जानेवारी, २००७ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले. या अपिलाची अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १७ जानेवारी २००७ रोजी सुनावणी घेवून अपिल अंतिम केले व त्यामध्ये अपिलार्थीस प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती सोडून इतर उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्सप्रती अपिलार्थीस आठ दिवसात देण्याचे सूचीत केले. तद्नंतर जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांचे कार्यालयातील पत्र दिनांक- २५-०१-२००७ व्दारे अपिलार्थीस आवश्यक असणारी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येवून घेवून जाण्याचे सूचीत केले. या पत्राच्या सूचनांच्या अनुषंगाने अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार गेले असतांना देखील त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. असे अपिलार्थीने आज सुनावणीत सांगितले.

कोणत्याहि प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थी यांनी दिनांक- ०८-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले. आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी अपिला मध्ये प्रथम केलेल्या अर्जाव्दारे केलेली मागणी कायम ठेवली असल्याचे स्पष्ट केले.

अपिलाचे कारण म्हणून अपिलार्थी यांनी अपूर्ण व असमाधानकारक उत्तर व माहिती अप्राप्त असे दिले आहे. या प्रकरणाच्या संदर्भात आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये औरंगाबाद येथील सर्वे नंबर ८३ व ९१ मधील १७८४९ व १७८५० या दोन भुखंडाच्या पीआर कार्डावरती शेतीकडे असा उल्लेख केला आहे हे दोन भूखंड सोडून इतर सर्व भूखंडाच्या उता-यावर अकृषी व सारामाफी असा उल्लेख आहे. फक्त या दोन भूखंडाचा शेतीकडे असे लिहीण्या मागचा महसूल यंत्रणेचा हेतू जाणण्याची अपिलार्थीची इच्छा आहे. तव्दतच या क्षेत्रामध्ये असलेले अंतर सर्व भूखंडाचे क्षेत्र वजा करुन अर्जदारास १७८४९ व १७८५० या भुखंडाच्या ७/१२ चा उतारा हवा असल्याचे दिसून येते. अर्जदाराने केलेली मागणी ही कायदेशीर आहे. तथापि ही मागणी नगर भुमापन कार्यालयाशी संबंधीत आहे. असे अपिलिय अधिकारी यांच्या तर्फे प्रतिपादन करण्यात आले. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती महसूल विभाग व नगर भुमापन विभाग या दोन्हीहि विभागाशी संबंधित ही माहिती असल्यामूळे या प्रकरणाची जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी स्वतः तपासणी करुन अपिलार्थी यांना माहिती न मिळण्याची कारणे शोधून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व अपिलार्थी यांनी मागणी केलेली आवश्यक ती कागदपत्रे पुढील तीस दिवसाच्या आत त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास त्यानंतर आठ दिवसाच्या आत सादर करावा व त्याच बरोबर या प्रकरणातील सर्व नस्त्या अपिलार्थी यांना, ज्या वेळी सदर नस्ती अपिलार्थी हे पहाणीसाठी लेखी मागणी करतील, त्यावेळी प्राथम्याने माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार

अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्याव्यात. असे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१ अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२ जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी या प्रकरणाची स्वतः तपासणी करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेले आवश्यक ती कागदपत्रे तीस दिवसाच्या आत त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत व त्याच बरोबर अर्जदारास माहिती वेळेत न मिळण्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

औरंगाबाद
दिनांक १२ एप्रिल, २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

प्रत-

१ श्री. गोपाळ तुकारामपंत देव, केळीबाजार, सुपारी हनुमान रोड, कामधेनु कॉर्नर समोर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/१३३/**रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक- १७ एप्रिल, २००७.

१. श्री.रामनारायण मयारामजी बंग -अपिलार्थी
पहिला माळा, दै. प्रजावाणी कार्यालय,
औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर,
नांदेड.

**विरुध्द.**

१. जनमाहिती अधिकारी तथा - प्रतिवादी
उपअभियंता
नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड.

२. अपिलिय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १७ एप्रिल, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.राम नारायण मयारामजी बंग (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल.), जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड. श्री.एम.एस.बाशेट्टी ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड श्री. मोहन धो. वाघमारे (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम दिनांक- १३-११-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांना खालील प्रमाणे माहिती विचारली होती.

" प्रभागामध्ये विकास कामे करण्यासाठी किती प्रकारच्या निधीची नगरसेवकास उपलब्धता असते. याची सविस्तर माहिती प्र.क्र.१९ मध्ये २००२ ते २००६ पर्यंत किती व कोणत्या प्रकारे निधी उपलब्ध झाला. कोणत्या निधीतून कोणती विकासाची कामे झाली. प्रत्येक कामाच्या रकमेची माहिती हि सर्व कामे समाधानकारक आहेत काय, तक्रार असल्यास माहिती."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षीली होती.

सर्व विकास कामाची माहिती अपेक्षीत होती का, असे अपिलार्थीसविचारले असता त्यांना फक्त बांधकाम विभागाची माहिती अपेक्षीत होती, असे अपिलार्थीने सुनावणीमध्ये सांगितले. विकास कामांच्या माहिती मध्ये विद्युत विषयक कामे, पाणी पुरवठा, जल निस्सारण इत्यादी खात्याचा देखिल समावेश असतो व ही कामे देखील विकास कामे म्हणून संबोधिली जातात. याची माहिती अपिलार्थीस पाहिजे किंवा कसे हे विचारल्या नंतर बांधकाम खात्या व्यतिरिक्त इतर खात्याची माहिती त्यांना या अर्जात अपेक्षीत नसल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये सांगितले.

अपिलार्थीस अपेक्षीत माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक- २६-१२-२००६ रोजी अपिलिय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील १९ (१) प्रमाणे प्रथम अपिल केले. सदर अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांची मुळची मागणी कायम ठेवली आहे. तसेच अपिल करण्याचे कारण, माहिती मिळाली नाही. असे दर्शविले आहे.

तथापि या अपिलावर अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे स्वतः अपिलिय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही. माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे दाखल होणारी अपिले त्यांनी कायद्यामध्ये नमूद केलेल्या मुदतीत, योग्य त्या पध्दतीने निकाली काढणे अनिवार्य असल्याची त्यांना समज देण्यात आली. त्यांच्या बेफिकीर वृत्तीची आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका यांनी नोंद घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध होत नसल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०३-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. सदर व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांची मूळची माहितीची मागणी कायम ठेवून अपिलार्थीस अपेक्षीत माहिती न मिळाल्यामूळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पहाणी करता अपिलार्थीच्या दिनांक- १३-११-२००६ रोजीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १२-१२-२००६ रोजी किंवा तत्पूर्वी ही माहिती अपिलार्थीस देणे अपेक्षीत होते. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी शहर अभियंता यांच्या कार्यालयाकडून प्रथमतः दिनांक- २२-१२-२००६ रोजी अपिलार्थीस अत्यंत त्रोटक स्वरुपात काही माहिती दिल्याचे दिसते. तद्‌नंतर दिनांक- ०९-०४-२००७ रोजी थोडयाशा विस्ताराने परत दुस-यांना माहिती दिली आहे. या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाल्याचे आज सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी कबूल केले आहे.

अपिलार्थीला जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम माहिती जी दिनांक- १२-११-२००६ रोजी देणे अपेक्षीत होते. ती दिनांक- २२-११-२००६ रोजी त्रोटक स्वरुपात देण्यात आली आहे. म्हणजेच

प्रथम माहिती देण्यास एकूण दहा दिवसाचा, कोणत्याही वैध कारणाशिवाय, विलंब झाला आहे.हे स्पष्ट होत आहे.

माहिती देण्यास उशीर झाल्याचे कारण विचारता, कामाच्या व्यापामूळे जन माहिती अधिकारी हे ही माहिती वेळेत उपलब्ध करु देवू शकले नाही. असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापि त्यांचा हा खुलासा पटण्याजोगा नाही. आपणास कामांचा भार जास्त झाला आहे काय व असल्यास त्याप्रमाणे निकालपत्रात आयुक्तांना शिफारस करावी किंवा कसे हे विचारल्यानंतरही जनमाहिती अधिका-याने काहीही स्पष्टीकरण दिले नाही. जनमाहिती अधिका-यास पुरेशी संधी देवूनही या विलंबाचे समर्थन ते आयोगा पुढे सिध्द करु शकले नाहीत. म्हणून माहिती अधिकार कायदा २००५ मधील २० (१) च्या तरतुदीप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांना प्रति दिन २५०/- रुपये प्रमाणे अपिलार्थीस प्रथम माहिती पुरविण्यास दहा दिवस विलंब लावल्याच्या कारणास्तव एकूण २५००/- रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे व अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांना एकुण रुपये २५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. ती त्यानी योग्य त्या शीर्षाखाली शासकीय कोषागारात ३० दिवसाचे आत जमा करावी.

३. आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका यांनी माहिती अधिकार कायदा २००५ च्या अंमलबजावणी संदर्भात सर्व क्षेत्रिय अधिका-यांकरिता वेळोवेळी प्रशिक्षणे, शिबीरे / कार्यशाळा आयोजित कराव्यात.

औरंगाबाद, दिनांक- १७ एप्रिल, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**<u>प्रत-</u>**

१. अपिलार्थी श्री. रामनारायण मयारामजी बंग, पहिला माळा, दैनिक प्रजावाणी कार्यालय, इंडस्ट्रीयल ईस्टेट, शिवाजीनगर, नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड. यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी व केलेली कार्यवाही आयोगास विनाविलंब कळविण्यात यावी.

५. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई -३२ यांना सदर निर्णय शासनाच्याव वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/१३४**/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक- १७ एप्रिल, २००७.

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील -अपिलार्थी
मोंढा रोड गंगापूर जि. औरंगाबाद.

**विरुध्द.**

१. जनमाहिती अधिकारी तथा - प्रतिवादी
तहसीलदार, गंगापूर

२. अपिलिय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वैजापूर.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १७ एप्रिल, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील (येथून पुढे अपिलार्थी म्हणून संबोधले जाईल.), हे गैरहजर आहेत व त्यांच्या वतीने देखील कोणीही हजर नाही. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) यांच्या वतीने श्री. आर.डी.जोशी, नायब तहसिलदार (राजस्व) व अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.सोरमारे, हे हजर आहेत.

अपिलार्थीने तहसिलदार गंगापूर यांचेकडे प्रथम माहिती मागितलेल्या अर्जाची प्रत व्दितीय अपिलासोबत जोडली नाही. तथापि प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे दिनांक- १७-१०-२००६

रोजी केलेल्या प्रथम अपिलाची प्रत जोडली आहे. त्यांनी आयोगाकडे दिनांक- ३०-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. हे अपिल त्यांना गंगापूर, वैजापूर तालूक्यातील स्वस्त धान्य दुकानदाराच्या तपासणीच्या शेरे बुकाच्या झेरॉक्स प्रतीच्या उपलब्धते संदर्भात आहे. आज अपिलार्थीचे दिनांक- ३०-०१-२००७ रोजीचे व्दितीय अपिल विचाराधीन आहे.

अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील यांनी याच प्रकारच्या माहितीच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २३-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले होते. त्या अपिलाची सुनावणी दिनांक- २० मार्च, २००७ रोजी झाली व त्या संदर्भात दिनांक- २० मार्च, २००७ रोजी निर्णय जाहिर करण्यात आला. अपिलार्थीने आता नव्याने केलेल्या अपिलात तीच मागणी असल्यामूळे अपिलार्थीचे आज रोजीचे अपिल क्रमांक- १३४/रामाआ/ औ/२००७, अशाच अपिलाची पूर्वी एकदा सुनावणी होऊन निर्णय झाला असल्यामूळे पुन्हा सुनावणी घेण्याचे प्रयोजन उरत नाही. तसेच अपिलार्थीने त्याला या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली असल्यामूळे सुनावणी रद्द करण्या विषयी दिनांक-१६-०४-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये राज्य माहिती आयोगास विनंती केलेली आहे. त्यामूळे अपिलार्थीचे हे विचाराधीन अपिल फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- १७ एप्रिल, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील ,सोनहिरा मोंढा रोड, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.
२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर
३. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई -३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
४. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/१३५**/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक- १७ एप्रिल, २००७.

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील -अपिलार्थी
मोंढा रोड गंगापूर जि. औरंगाबाद.

**विरुध्द.**

१. जनमाहिती अधिकारी तथा - प्रतिवादी
तहसीलदार, गंगापूर

२. अपिलिय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वैजापूर.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १७ एप्रिल, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील (येथून पुढे अपिलार्थी म्हणून संबोधले जाईल.), हे गैरहजर आहेत व त्यांच्या वतीने देखील कोणीही हजर नाही. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) यांच्या वतीने श्री. आर.डी.जोशी, नायब तहसीलदार (राजस्व) व अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.सोरमारे, हे हजर आहेत.

अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील यांनी आयोगाकडे केलेल्या दिनांक- ०१-०२-२००७ रोजीच्या व्दितीय अपिला सोबत त्यांच्या माहितीचा मूळ अर्ज जोडलेला नाही. तथापि त्यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) प्रमाणे केलेल्या दिनांक- ०१-११-२००६

रोजी केलेल्या प्रथम अपिलाची झेरॉक्सप्रत सोबत जोडली आहे. अपीलार्थीचे दिनांक- ०१-०२-२००७ रोजीचे अपिल आता विचाराधीन आहे.

अपिलार्थीने दिनांक- ०१-११-२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्याकडे केलेल्या अपिलावर व्दितीय सुनावणी राज्य माहिती आयोगा तर्फे या पूर्वीच म्हणजे दिनांक- १६ मार्च, २००७ रोजी घेण्यात येवून योग्य तो निर्णय पारीत केला आहे. त्यामूळे आता याच विषयावर पुन्हाः नव्याने सुनावणी घेण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. अपिलार्थीने याच विषयावर केलेल्या दुस-या अपिला संदर्भात देखील अपिलार्थीने आयोगाकडे दिलेले पत्र दिनांक- १६-०४-२००६ पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती व दिनांक- १६-०३-२००७ रोजीचा निर्णयहि प्राप्त झाला आहे व आता अपिलार्थीने सुनावणी रद्द करण्याची विनंती केलेली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे हे विचाराधीन अपिल फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- १७ एप्रिल, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील ,सोनहिरा मोंढा रोड, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर

३. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई -३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

४. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक    २००७/१३६/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक    १८ एप्रिल २००७

१ श्री.सुभाष नथ्थु थोरात (पाटील) : अपीलार्थी
संपादक, साप्ताहिक भ्रष्टाचाराचा मापदंड
८६, क्षितीज, एन-१३, वानखेडेनगर,हडको,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :
सह दुय्यम निबंधक वर्ग-२
औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
औरंगाबाद

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. सुभाष नथ्थु थोरात (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, औरंगाबाद श्री.गोरखनाथ बाळासाहेब कु-हाडे (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक , औरंगाबाद श्री.लिंबाजी कोंडीबा मुंढे (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक- १४-११-२००६ रोजी मौजे- सुंदरवाडी तालूका- जिल्हा- औरंगाबाद मधील गट क्रमांक- ३९ मधील २०x३० च्या प्लॉट संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" १) मौजे सुंदरवाडी ता.जि. औरंगाबाद मधील गट नंबर ३९ मधील सर्व २०x३० च्या प्लॉटचे आपल्या कार्यालयातील औरंगाबाद क्र.३ तसेच मधील झालेल्या सर्व खरेदी खताच्या / मुखत्यारनामाच्या / ईसारपावती/ बक्षीसपत्रक / दानपत्रक/ गहाणखत/ तारणखत व इतर नोंदीच्या सर्व सत्यप्रती

२) सर्व प्रकारच्या ७/१२ च्या सत्यप्रती नोंदी समवेत

३) सर्व प्रकारच्या अकृषीक कराच्या पत्रकासमवेत कर भरल्याच्या ट्रेझरीच्या चलनाची प्रतीच्या सत्यप्रती

४) सर्व प्रकारच्या दस्तगोषवारा भाग-१ व भाग-२ च्या सत्यप्रती/ व इतर तपशिलासहीत.

५) आपल्या कार्यालयात कोणती नोंद कोणत्या बूकात कोणत्या नंबरी नोंदविला त्या नोंदबुकाची सत्यप्रत.

६) सदर प्रकरणाची नोंद आपल्या कार्यालयात कोणत्या अधिकारी/ कर्मचारी यांनी नोंद घेतली त्याचा कार्यालयीन तपशिलाची प्रत. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

वरील माहिती मध्ये अपिलार्थीने काही माहितीच्या संदर्भात फक्त तपशिल एवढीच नोंद केली असून काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. अपिलार्थी यास अशा प्रकारची प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी देणे माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये अभिप्रेत नाही. व तसेच तपशिल म्हणजे नेमकी काय माहिती हवी आहे हे या अर्जामध्ये स्पष्ट होत नाही. हे अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी सांगण्यात आले.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०५-१२-२००६ रोजी उत्तर देवून अपिलार्थीस नोंदणी अधिनियम १९०८, नोंदणी व इतर संबंधित कायदे (सुधारणा) अधिनियम २००१ मधील कलम ७८ खाली शासनाने फी विहीत केली आहे व कलम ७९ खाली टेबल ऑफ फीच्या तरतुदी प्रमाणे अपिलार्थीस प्रत्येक नोंदणीच्या अर्जावर प्रमाणीत नकल किंवा सूची क्रमांक दोनच्या संगणीकृतच्या प्रतीसाठी काय दराने रकम घ्यावी लागेल, याचे मार्गदर्शन केले आहे. सदर नकल देण्याचे काम खाजगीकरणांतर्गत चालू असल्याने या प्रकरणी संबंधित विभागाने त्यांचे दर वेगळया करारावद्दारे अलहिदा निश्‍चित केले आहेत.

जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त झालेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थी यांनी सह दुयम निबंधक, औरंगाबाद यांचे कार्यालयात दिनाक- १३-१२-२००६ रोजी रकम रुपये ५,५४०/- इतक्या रकमेचा भरणा केलेला आहे. सदर रकम एकूण २७ नकलाच्या प्रती व २७७ पानाच्या करिता फीस म्हणून आकारली गेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या गट क्रमांका मध्ये एकुण १६ खरेदीखते व ११ मुखत्यारनामेची नोंद झाली आहे. अशा प्रकारची माहिती देतांना नोंदणी अधिनियमा मधील तरतूदी नुसार रजिष्ट्रेशन फी, स्टॅम्प ॲक्ट नुसार कोर्ट फी तिकीटे सदर अर्जास लावणे गरजेचे असते. अपिलार्थीने जरी दिनांक- १३-१२-२००६ रोजी आवश्यक ती रकम सहजिल्हा निबंधक औरंगाबाद कार्यालयात भरली असली तरी त्या दिवशी अपिलार्थीने आवश्यक ती कोर्ट फी ची तिकिटे त्यांच्या कार्यालयात आणून दिली नाहीत. सदरची कोर्ट फी ची तिकिटे अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- ३०-१२-२००६ रोजी दिली असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तथापि जनमाहिती अधिकारी यांच्या म्हणण्या नुसार अपिलार्थी यांने दिनांक- ३०-१२-२००६ रोजी तिकिटे आणून दिली नसून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर तिकीटे आणून देण्या विषयी कळविले आहे. त्या प्रित्यर्थ

त्यांनी सदर कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत. अंतिमतः माहिती अपिलार्थीस आवश्यक माहिती दिनांक- ०१-०२-२००७ रोजी अंशतः प्राप्त झाली असल्याचे दिसून येते.

प्रथम अपिलिय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक- १२-०१-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. असे जनमाहिती व अपिलिय अधिकारी यांचे म्हणणे आहे. तर सुनावणीचे पत्र आपणास प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. सुनावणीच्या निर्णयामध्ये 'अपिलार्थी गैरहजर ', एवढाच शेरा अपिलिय अधिकारी यांनी सुनावणीच्या पत्रावर लिहीलेला आहे. हे पाहता सुनावणी करिता योग्य त्या पध्दतीचा अवलंब न करता अपिलिय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. हे स्पष्ट होते. अपिलिय अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून त्यांच्या या कृतीस "अपिल घेण्याचे अपिलिय अधिकारी यांनी टाळले," असे म्हणणे जास्त योग्य होईल.

वरील सर्व प्रकारामूळे व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०२-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी आपली मुळची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून टेबल ऑफ फी प्रमाणे रजिष्ट्रेशन फी घेतल्या नंतरही दिनांक- ०१-०२-२००७ रोजी दिली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये स्पष्ट केले. अद्यापही कोणती माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे. असे विचारता, अपिलार्थीस अद्यापहि अकृषिक कर भरल्याच्या पावत्या तसेच कोणत्या नोंदी कोणत्या बूकात घेतल्या, हा तपशिल मिळाला नसल्याचे अपिलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. तर अकृषिक कर तहसील कार्यालयात भरला असल्यामूळे अपिलार्थी यांनी ही माहिती तहसील

कार्यालया कडून प्राप्त करुन घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तव्दतच ज्या जमिनीच्या व्यवहारामध्ये अकृषिक कर भरल्याची पावती त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्या सर्व पावत्याची झेरॉक्सप्रत अपिलार्थी यांना दिली आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले व ते जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या संचिकेतील कागदपत्रावरुन दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थी यांना आकारण्यात आलेली अतिरिक्त रकम रुपये १,८६०/- ही परत करण्या संदर्भात, सह जिल्हा निबंधक औरंगाबाद कार्यालयात अपिलार्थी हे वेळोवेळी स्वतः जावून, पत्रव्यवहार करुनहि अपिलार्थी यांच्या हया पत्रव्यवहारावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही कृती केली नाही. गेल्या चार महिन्यापासून अपिलार्थी या संदर्भात सतत पत्रव्यवहार करीत आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या या उदासिनतेची सखेद नोंद आयोगाने घेतली असून त्यांच्या अशा प्रकारच्या प्रवृतीस त्यांनी वेळीच आळा घालावा, अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

अपिलार्थीस जनमाहिती अधिका-याने पुरविलेल्या झेरॉक्स प्रतीची पहाणी करता त्या अत्यंत अस्पष्ट स्वरुपाच्या असून त्या वाचता येत नाहीत. याच बरोबर नोंदणी अधिनियम, १९०८ मधील कलम ७० प्रमाणे मुखत्यार-पत्र हे फक्त मुखत्यारपत्र करुन देणा-या व्यक्तीसच देण्यात येते. त्यामूळे ते अपिलार्थी यांना देता येणार नाही. असे जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये आयोगाच्या निदर्शनास आणले. नोंदणी कायद्यातील सदर तरतुदीमूळे अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मुखत्यारपत्रांच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणार नाहीत, हे उघड आहे. तथापि ही मुखत्यारपत्रे देण्यापोटी अपिलार्थी यांच्या कडून जी रकम सह दुय्यम निबंधक औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयात प्रथमतः जमा करुन घेतली होती ती सर्व जादाची रकम, सात दिवसाच्या आत जनमाहिती

अधिकारी यांनी अपिलार्थी यांना परत करावी. तव्दतच अपिलार्थी यांना पुरविलेल्या सर्व झेरॉक्सप्रती, कोणतीही फी न आकारता परत एकदा स्पष्ट व वाचनीय स्वरुपात सात दिवसाच्या आत पुरवाव्यात, असे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी कडून घेतलेली जादा रकम रुपये १,८६०/- सात दिवसाच्या आत परत करावी.

३. अपिलार्थी यांना या पुर्वी पुरविलेल्या झेरॉक्सप्रती वाचता येण्याजोग्या नसल्याने त्यांना संदर्भीय झेरॉक्स प्रती परत एकदा वाचता येण्या योग्य अशा स्वरुपात, विनामूल्य, सात दिवसाच्या आत पुरवाव्यात.

औरंगाबाद
दिनांक १८ एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

<u>प्रत,</u>

१ श्री. सुभाष नथ्थु थोरात (पाटील) संपादक, साप्ताहिक भ्रष्टाचाराचा मापदंड ८६,, क्षितीज, एन-१३, वानखेडेनगर, हडको, औरंगाबाद

२. जनमाहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलिय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/२५४/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक १८ एप्रिल २००७

१ संतोषकूमार रंगनाथ गावंडे : अपीलार्थी
मु. मांगेगाव, पो. तळपिंप्री,
तालूका-गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद.

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. संतोषकुमार रंगनाथ गांवडे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद डॉ. रमेश मोरे (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) यांचे वतीने श्री.अरुण डुबे, प्रकल्प संचालक, जिल्हा परिषद, औरंगाबाद हेहि हजर आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी हे जिल्हापरिषद औरंगाबाद यांच्याकडे पशुसंवर्धन खात्यामध्ये प्रकल्प बाधित संवर्गातून पशुधन पर्यवेक्षक या पदावर नोकरी मागीत आहेत व त्या प्रित्यर्थ ते पशुसंवर्धन विभागाकडे वेळोवेळी आस्थापना बाबी विषयक माहिती मागवीत आहेत.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने दिनांक- १२-०७-२००६, १४-०८-२००६ व १२-०९-२००६ रोजी केलेले तीनहि अर्ज विचारात घेण्यात येत आहेत.

अपिलार्थी हे जिल्हापरिषद औरंगाबाद कडे पशुधन पर्यवेक्षक या पदावर प्रकल्पग्रस्त या प्रवर्गातून नियुक्ती देणे बाबत वारंवांर जिल्हापरिषदेकडे अर्ज करीत आहेत. अपिलार्थी यांच्या म्हणण्या नुसार त्यांनी १९९७-१९९८ मध्ये जिल्हापरिषद औरंगाबाद यांच्याकडे पशुधन पर्यवेक्षक या पदावर प्रकल्पग्रस्त या संवर्गातून नियुक्ती करणे बाबत त्यांनी अर्ज केला होता. तथापि त्यांचा अर्ज अद्यापही विचारात घेतला गेला नाही.

अपिलार्थी यांनी दिनांक- १८-०६-१९९८ रोजी पशुधन पर्यवेक्षक या पदावर नियुक्ती मिळणे बाबत अर्ज केला होता. तथापि नोकरी भरतीची प्रक्रिया दिनांक- १४-०६-१९९८ रोजीच पूर्ण झाल्यामूळे अपिलार्थीस त्या पदावर नेमणूक देता येणे जिल्हापरिषदेस शक्य झाले नाही. अपिलार्थीने वेळोवेळी जिल्हापरिषदेकडे या प्रकरणी केलेल्या अर्जास अनुसरुन जिल्हापरिषदेने त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि अद्यापहि काही मुद्यावर अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी हे आज सुनावाणीमध्ये सांगत आहेत. ही अप्राप्त माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी दिनांक- २६-०९-२००६ रोजी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले होते.

या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांचेकडील दिनांक- १३-१०-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये अपिलार्थीस असे कळविले आहे की, " सदर अपिल अर्जावर आपण फीस भरलेली नाही परंतू त्या सोबत आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील प्रमाणपत्र जोडलेले आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटाकातील व्यक्तींना अपिल अर्जावर मुद्रांक शुल्क फीस न लावण्याच्या संदर्भात केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ मध्ये उल्लेख नाही. करिता नियमानूसार आवश्यक ते मुद्राक शुल्क आपल्या पातळीवर लावलेले नसल्यामूळे आपला अपिल अर्ज फेटाळण्यात येत आहे."

अपिलार्थीने जन अपिलिय अधिकारी यांच्याकडे केलेले अपिल पहाता, ज्या ठिकाणी २०/- रुपयेचे कोर्ट फी स्टँप अपिल अर्जास चिकटावयाचे आहे, तेथे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्ती अपिलार्थी हे स्वतः असल्याने आवश्यक ती फी अपिल अर्जावर त्या ठिकाणी चिटकविली नाही. अशा अर्थाचे अर्जदाराने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून दिल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीचे म्हणणे त्यांना जिल्हापरिषदने प्रकल्पग्रस्त संवर्गातून नेमणूकीचे आदेश द्यावेत असे आहे, आपले म्हणणे मांडण्याकरिता अपिलार्थी वेगवेगळया पातळीवर वेगवेगळया प्रकारे अर्ज करित असून त्यांच्या या प्रश्नाची तड लावण्या करिता ते प्रयत्नशील असल्याचे दिसते. अपिलार्थीस नेमणूक द्यावी किंवा कसे, याबाबत आयोगाचे भाष्य काहीही नाही. तथापि त्यांनी वैध प्रकारे मागितलेली माहिती त्यांना पुरविणे जिल्हापरिषदेला अनिवार्य आहे. माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीस, आतापर्यंत त्यांनी केलेल्या १४ अर्जापैकी १२ अर्जामध्ये मागितलेली माहिती, त्यांना विनाशुल्क पुरविल्याची माहिती आयोगास दिली व वेळोवेळी अपिलार्थीस दिली गेलेली माहिती व या संदर्भातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे दाखविली. (अद्यापही अपिलार्थीस या प्रकरणातील सर्व नस्त्या अपिलार्थी याने त्याप्रमाणे लेखी विनंती केल्यास दाखविण्याची संबंधित जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी तयारी दर्शविली. या कृतीस आयोगाची हरकत असण्याचे कारण नाही.)

जनअपिलिय अधिकारी यांच्या वरील निर्णयावर व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २४-११-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे. त्या व्दितीय अपिलावर देखील अपिलार्थीने २०/- रुपयाचा न्यायालयीन मुद्रांक चिटकविला नाही. त्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांनी केलेला "स्वतः आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील असल्यामुळे हा मुद्रांक चिकटवला नाही " हा युक्तिवाद म्हणजे कायदेशीर तरतुद न पाळण्या करिता शोधलेली अवैध पळवाट आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीचे हे म्हणणे आयोग अमान्य करीत असून जनअपिलिय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता नाही. असे आयोगाचे ठाम मत झाले आहे. अपिलार्थीने न्यायालयीन फी मुद्रांक चिटकविलेल्या कागदावर अर्ज

करुन त्यांच्या माहितीची मागणी कायद्याव्दारे विहित केलेल्या पध्दतीने करावी. सबब अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे व खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १८ एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोषकूमार रंगनाथ गावंडे, राहणार- मांगेगाव, पो. तळपिंप्री, तालूका-गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/१२९/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक १९ एप्रिल २००७

१ श्री.गजानन विठ्ठल पाटील, : अपीलार्थी
सोनहिरा मोंढा रोड,गंगापूर, तालूका-गंगापूर
जिल्हा- औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :
वैद्यकिय अधिकारी ,
प्राथमिक आरोग्य केंद्र, भेंडाळा
तालूका-गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, भेंडाळा,तालूका-गंगापूर, डॉ.यु.आर.चव्हाण (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत व जन अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद, औरंगाबाद (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या वतीने सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.एस.एम.खान हे हजर आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दिनांक- १८-०९-२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागविली आहे.

"प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात काम करणा-या कर्मचा-याची नांवे, त्यांची मुख्यालये, त्या ठिकाणचा पत्ता कायम स्वरुपी आवश्यक असणा-या औषधाची यादी, त्यांचा स्टॉक्, कमी असलेली औषधीची मागणी अर्ज, त्यावरील वरिष्ठ अधिका-याचा निर्णय ( ३१-३-३००६ अखेर परिस्थीतीत.)"

वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र क्रमांक- ३५४/०६, दिनांक- २३-०९-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये सर्व माहिती पुरविली आहे.

तथापि या माहितीवर अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दिनांक- १७-१०-२००६ रोजी केले. सदर अपिलामध्ये त्यांनी माहिती अप्राप्त असल्याचे कारण नमूद केले आहे.

या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २७-११-२००६ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीमध्ये ही माहिती अपिलार्थी यांना मिळाली नसल्यास ती पुन्हा देण्या विषयी जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत. अपिलिय अधिकारी यांनी ठेवलेल्या अपिलाचे रजिष्टर पहाता ते अत्यंत अव्यवस्थीतपणे ठेवल्याचे दिसते. सदर रजिष्टरला कोणतेही पृष्ठ क्रमांक दिलेले नाहीत. अपिल निर्णयावरुन कोणताही बोध स्पष्ट होत नाही. फक्त अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास अपिलार्थीस ती परत देण्यात यावे, एवढाच अर्थ बोध त्यातून निघतो. अपिलिय अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून प्रत्येक अपिलाची सुनावणी वेगवेगळी ठेवून त्यांनी प्रत्येक अपिलावर वेगळा निर्णय पारीत करणे आवश्यक आहे. हे अपिलिय अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित असलेल्या प्रतिनिधीस समजावून सांगण्यात आले. अपिलार्थी यांना सुनावणीचा निर्णय अद्यापहि अपिलिय अधिकारी यांनी कळविल्याचा कागदोपत्री कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्याच बरोबर आयोगाच्या सुनावणीसाठी अपिलिय अधिकारी यांची गैरहजर राहण्याच्या या वृत्तीची राज्य माहिती

आयोगाने सखेद नोंद घेतली असून अपिलिय अधिकारी यांनी या पुढे आयोगाच्या सुनावणीस व्यक्तीशः न चुकता हजर राहणे अनिवार्य आहे. असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ३०-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले असून त्यामध्ये अपिलार्थीने त्यांची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

सुनावणीचे वेळी झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास असे आणून दिले आहे की, त्यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती त्यांचेकडील पत्र क्रमांक- ३५४०६, दिनांक- २३-०९-२००६ रोजी रजिष्टर पोष्टाने पुरविलेली आहे व त्या प्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांनी पोष्टाची कागदपत्रे आयोगास दाखविली.

अपिलार्थीने दिलेल्या माहितीची पहाणी केली असता अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मोफत पुरविल्याचे दिसते. यामध्ये वरिष्ठ अधिका-याचा निर्णय, एवढीच बाब राहून गेल्याचे दिसते. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी आवश्यक त्या औषधाचे मागणीपत्र त्यांच्या वरिष्ठ अधिका-याकडे पाठविले व त्यांच्या वरिष्ठ अधिका-याने त्यांच्या मागणी प्रमाणे योग्यत्या औषधांचा पुरवठा केलेला आहे. त्याकरिता त्यांच्या वरिष्ठ अधिका-याने वेगळे आदेश काढलेले नाहीत. त्यामूळे या आदेशाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगातर्फे मान्य करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थी यांना रजिष्टर पोष्टाने पाठविली. सदर रजिष्टर पोष्टाची पोंच पावती आज झालेल्या सुनावणीमध्ये आयोगा समोर सादर केली आहे. या पोच पावतीवर तारखेचा शिक्का अस्पष्ट दिसत आहे. तथापि एके ठिकाणी तांबडया शाईमध्ये २३/०९/०६ अशी तारीख लिहीली गेली असल्याचे दिसते. ही माहिती अपिलार्थी यांना मिळाली असल्याचे या कागदपत्रावरुन स्पष्ट होते.

अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती वेळेत मिळाली असल्यामूळे व सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी मिळती जुळती असल्यामूळे अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

येथे असे ही नमूद करण्यात येते की, सदर अपिलार्थी हे वेगवेगळया प्राथमिक आरोग्य केंद्रातील कागदपत्राची वेगवेगळया अर्जाव्दारे स्वतः माहितीच्या अधिकारा खाली मागणी करतात व सुनावणीच्या वेळी गैरहजर राहत असतात. त्यांच्या हया कृतीची राज्य माहिती आयोगाने दखल घेतली असून त्यांनी अशा प्रकारचे वर्तन टाळण्या बाबत त्यांना सूचीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १९ एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील, सोनहिरा मोंढा रोड, गंगापूर, तालूका-गंगापूर, जिल्हा-औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र भेंडाळा, तालूका-गंगापूर जिल्हा-औरगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलिय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या बेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/१४०/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक १९ एप्रिल २००७

श्री.उदय प्रभाकर देशमूख : अपीलार्थी
घर क्र.४६२,
औरंगाबाद नगर रोड,
पंढरपूर, तालूका जिल्हा-औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा उप-मुख्य : प्रतिवादी
कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळ,मुंबई.

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. उदय प्रभाकर देशमुख (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद श्री.शिवाजी दिवेकर (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत व जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ , मुंबई (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे अनुपस्थित होते . त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने सखेद नोंद घेतली असून येथून पुढे

आयोगाकडून सुनावणीचे पत्र प्राप्त झाल्यास त्यांनी विहीत केलेल्या दिवशी सुनावणीस व्यक्तीशः हजर राहावे, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- १०-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"वाळूज औद्योगिक क्षेत्र, भुखंड क्र.सी-२६२,२६३,२६४ व २९२ यांना आपले कार्यालयाने २२ मार्च, २००५ रोजी, सी- २६२ यांना तसेच ३ मार्च २००५ रोजी सी-२६३, यांना ३० मे २००५ रोजी सी-२६४ यांना ३० मे २००५ रोजी, सी- २९२ यांना दोन वेळा वापरातील व्यापारी बंदला बाबत नोटिस दिल्या होत्या व नियमा प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळवले होते. व यानंतर स्थापत्य विभाग, मऔविम औरंगाबाद यांना कार्यकारी अभियंता यांना कारवाई तात्काळ व्हावी असे पत्र दि. २१ जून, २००५ रोजी दिले होते. जन हिता साठी दिलेल्या जागेचे झालेले तसेच शासनाचे व मऔविमंचे होणारे नुकसान टाळण्यासाठी व जागा परत जनहीताच्या कामासाठी परत मिळण्यासाठी हि माहिती आवश्यक आहे. यावर २१ जून २००५ पासुन आज पर्यन्त काय कारवाई झाली किंवा होत आहे. याचि अभिलेखा प्रमाणे छायांकित प्रत व कार्यकारी अभियंता यांना दिलेलेले पत्रातील माहिती/आदेश कोणत्या नियमाने दिले आहेत, तो नियम अभिलेखा प्रमाणे देणे."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या वरील दिनांक- १०-०८-२००६ रोजीच्या पत्रास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यास प्रथमतः त्यांचेकडील पत्र क्रमांक- ४६९०, दिनांक- २३-०८-२००६ रोजी खालील प्रमाणे प्रथम उत्तर दिले.

" भुखंडधारका समवेत महामंडळाने केलेला प्राथमिक करार मऔविमं ची अट क्रमांक-४ मधील उपकलम (N) नूसार व अंतिम करारनाम्यातील कलम दोन मधील उपकलम (U) नूसार उपलब्ध भूखंड धारकांनी औद्योगिक वापरा ऐवजी व्यापारी केल्याचे आढळल्यामूळे नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. "

अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील वरील उत्तरामूळे अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक- २१-०९-२००६ रोजी अपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांची माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलाची सुनावणी अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १६-१०-२००६ रोजी घेतली व सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, मऔविमं औरंगाबाद यांनी भूखंड धारका समवेत करण्यात येणारा प्राथमिक करारनामा व अंतिम करारनामा कलम व उपकलमाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याच्या सूचना जनमाहिती अधिकारी यांना दिल्या व अपिल निकाली काढले.

यावर व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २९-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले. या अपिलाच्या संदर्भात आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांनी असा मुद्दा मांडला की, मऔविमं कडून औद्योगिक वापराकरिता घेतल्या जाणा-या भूखंडाचा प्रत्यक्षतः व्यापारी स्वरुपाचा वापर केला जातो व परिणामतः शासनाचा करोडो रुपयाचा महसूल वाया जातो. या संदर्भात त्यांनी प्रथम माहितीच्या अर्जामध्ये काही भूखंडाचे नंबर देवून सदर भूखंडाच्या वापरात बदल झाल्या प्रकरणी मऔविमं कोणत्या नियमा अन्वये काय कार्यवाही करीत आहेत. याची माहिती मागविली होती. त्याच बरोबर मऔविमं यांनी आदेश दिल्यानंतर त्यांनी प्रथम केलल्या अर्जाच्या दिनांका पर्यंत म्हणजेच दिनांक- २१-६-

२००५ पासून  दिनांक- १०-०८-२००६ पर्यंतची या प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली. याच्या कागदपत्राच्या प्रती त्यांना पुरवण्यिाची मागणी  केली.  औद्योगिक वापरा करिता भूखंड मऔविमं कडून घेवून त्याचा व्यापारी कारणाकरिता उपयोग केल्यास हे  करारपत्रातील अटीचा भंग करणारे ठरु शकते व अशावेळी  कोणत्या नियमा नुसार काय कार्यवाही करावयाची आहे. या संदर्भात मऔविंमं यांनी काही दंडक निश्चीत केले आहते काय, याची तरतूद संदर्भीय  भूखंड धारका सोबत झालेल्या करारनाम्यामध्ये  केली आहे काय. हे जाणण्याची व अशी तरतूद केली असल्यास त्या तरतुदीचा करारनाम्यातील क्रमांक व ती तरतूद किंवा अशा प्रकारची तरतूद केली नसल्यास मऔविमं यांनी अशा करारपत्रातील अटींचा भंग झाल्या प्रकरणी काय कार्यवाही करावयाची आहे  हे अपिलार्थीस स्पष्टपणे कळविण्यात यावे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी  यांनी त्यांचेकडील उपलब्ध कागदपत्राचा शोध घेतला असता, अशा प्रकारची तरतूद त्यांना संबंधीत करारनाम्यामध्ये दाखविता आली नाही. तेंव्हा या प्रकरणी  नेमकी  निश्चीत वस्तुस्थिती काय आहे. हे अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी  यांनी या प्रकरणात निर्णय झाल्यापासून पंधरा दिवसात स्पष्ट करावी व त्याचे अनुपालन आयोगास कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे या प्रकरणी दिनांक- १०-०८-२००६ पर्यंत केलेली कार्यवाही सबंधातील सर्व  पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस मोफत  पुरविण्यात याव्यात. असे आदेशित करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविमं, मुंबई यांना असे सूचीत करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या प्रकरणी उपस्थित केलेला मुद्दा त्यांनी विचारात घेवून भूखंडधारक व मऔविमं यांच्या मधील प्रारुप करारनाम्या मध्ये करारपत्रातील अटीचा भंग  झाल्यास  कोणत्या पक्षाने काय कार्यवाही करावयाची आहे. या बाबतचे स्पष्ट निर्देश करणारे कलम प्रारुप

करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्या बाबत विचार करावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी वर उल्लेखीलेल्या प्रमाणे आवश्यक ती माहिती पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविमं, मुंबई यांनी वर उल्लेखीलेल्या प्रमाणे प्रारुप करारनाम्यामध्ये, शासनाचे आर्थिक हित लक्षात घेऊन योग्य ते बदल करण्या संदर्भात विचार करावा.

औरंगाबाद
दिनांक १९ एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

प्रत-

१ श्री. उदय प्रभाकर देशमुख, घर क्रमांक- ४६२, औरंगाबाद नगर रोड, पंढरपूर,तालूका- गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलिय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महारार्ष्ट औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/१०५/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक २० एप्रिल २००७

१ श्री.नशीम अहमद : अपीलार्थी
घर नं.४४०, सोमवार वार्ड,
मालेगाव- ४२३२०३

## विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा :
प्रमूख लिपीक, म.न.पा.शिक्षण मंडळ,मालेगाव
२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासकीय अधिकारी, म.न.पा.शिक्षण
मंडळ मालेगाव

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. नशीम अहमद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), . जन अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगर पालिका, मालेगाव श्री. एस.एच.दुसाने (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा प्रमूख लिपीक, म.न.पा.शिक्षण मंडळ,मालेगाव (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. शिक्षण संचालक, पुणे यांचे वतीने श्रीमती सुमन बाळासाहेब देशमाने, शिक्षण सहसंचालक, संचालनालय, पुणे व शिक्षण उपसंचालक यांचे वतीने कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्री.एस.बी.तडवी, हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- १३-११-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील पाच मुद्यावर माहिती मागविली होती.

"1) Please provide details of the Action Taken Report, on my Above mentioned letter dated ०७/१०/२००६, to the Administrative Officer of the Municipal School Board of the Malegaon Municipal Corporation

2) Do provide copies of the legal memos and notices of violations of rules and regulations of this office given to the Head Mistress of the Sheikh Abdul Wadood Primary School and the ATT

3) Do provide copies of the replies of the Head Mistress of the Sheikh Abdul Wadood Primary School and the ATT.

4) The Sheikh Abdul Wadood Pre Primary & Primary School and the ATT is collecting huge amounts of donations, directly or indirectly, in excess of the prescribed rates of fees regulated under section ४ of the Prohibition of Capitation Fee Act, १९८७ Do provide legal reasons, why the School Board did not reported these violations in previous २० years, as the Deputy Director of Education and the Divisional Commissioner had asked the A. O. many times ?

5) If the A. O. is not satisfied with the reasons given by the Head Mistress for not granting admissions to the applied students, then what legal or disciplinary action he had taken against the said or the Head Mistress ? If not, why ?

अपिलार्थीने सदर माहिती साध्या पोष्टाने मागविली होती. सदर माहितीचा कालावधी दिनांक- १३-०८-२००३ ते १३-११-२००६ असा दर्शविला होता. अपिलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०४-१२-२००६ रोजी अपिलार्थीस प्रथम उत्तर दिले आहे.

तथापि या उत्तरावर समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १२-१२-२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलाचे कारण म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चूकीची माहिती पुरविली व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने सदर शिक्षण संस्थेस अवैधरित्या कार्य करण्यास मदत होईल, अशा दृष्टीने हे उत्तर दिल्याचे अधीकचे कारण दर्शविले आहे.

सदर अपिलावर अद्यापही प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व सदर अपिल त्यांच्याकडे प्रलंबित असल्याचे जन अपिलिय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये कबुल केले आहे.

प्रथम अपिलावर वेळेत सुनावणी न झाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २०-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीने असा मुद्दा मांडला की, शेख अब्दुल वदूद प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा मालेगाव या शाळेमध्ये पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेच्या प्रवेशाकरता अवैधरित्या देणग्या गोळा केल्या जात आहेत, अशी त्यांना माहिती मिळाल्यावरुन त्यांनी त्या शाळेची चौकशी करण्या संदर्भात शिक्षण उपसंचालक, नाशिक यांचेकडे दिनांक- १२-०८-२००३ रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जावर अद्यापहि अंतिमतः कार्यवाही झालेली नाही, यावर जनअपिलिय अधिकारी यांनी ही कार्यवाही सहायक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांनी करावयाची आहे, असे सुनावणीमध्ये सांगितले. तर महाराष्ट्र शैक्षिणिक संस्था ( कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध ) अधिनियम १९८७ प्रमाणे या संस्थेवर कार्यवाही करण्यास शिक्षण संचालक हे सक्षम आहेत, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

शिक्षण संचालक, पुणे यांचे उपस्थित असलेले प्रतिनिधी व सहशिक्षण संचालक, पुणे यांना या विषयाची पृच्छा केली असता त्यांनी शालेय शिक्षण विभागाचे दिनांक- ०४-०६-१९९७ चा शासन निणर्य क्रमांक- एचएससी/ १०९७/ (१४४४)/९७/ पुमाशि-१, दाखविला. या आदेशामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्षामध्ये प्रवेश देण्या विषयी अवलंबावयाच्या कार्यपध्दतीचे विवेंचन करण्यात आले असून सदर आदेश प्राथमिक शाळाचे प्रवेशासाठी देखील लागू असल्याचे शासन निर्णयाच्या शेवटच्या परिच्छेदात नमूद करण्यात आले आहे.या निर्णयाचे अवलोकन केल्यास संबंधित शिक्षण संस्थेवर अर्जदारास अपेक्षित असलेली कार्यवाही करण्या संदर्भात निर्णय घेण्यास शिक्षण संचालक सक्षम असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने सदर शिक्षण संस्थे विरुध्द तक्रार केली असल्यामूळे अपिलार्थी यांच्या दोन मुलांना सदर शिक्षण संस्थेत जाणूनबुजून प्रवेश देत नाहीत. असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे व त्या संदर्भात त्यांनी शिक्षण संस्थेकडे, शिक्षण उपसंचालका कडे, शिक्षण संचालका कडे केलेल्या तक्रार अर्जा संदर्भात काय कार्यवाही झाली आहे. या संबंधीची कागदपत्रे अपिलार्थी यांना हवी आहेत. एकंदरीत अपिलार्थी यांची तक्रार दूर करण्याच्या दृष्टीने पुढील तीन बाबीवर कार्यवाही होणे आवश्यक आहे. असे आयोगास वाटते.

१) अपिलार्थीने या शिक्षण संस्थेच्या विरुध्द शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक, सचिव,शालेय शिक्षण यांच्याकडे केलेल्या तक्रारी अर्जा संदर्भातील सर्व नस्त्या, अपिलार्थी यांनी त्या प्रमाणे लेखी मागणी केल्या नंतर अपिलार्थीस त्या उपलबध करुन देणे.

२) अपिलार्थी यांचे दिनांक- १२-१२-२००६ रोजीच्या अपिलावर प्रथम अपिलिय अधिकारी यांनी विशिष्ट मुदतीत निर्णय घेणे.

३) सचिव (शालेय शिक्षण) यांनी या तक्रार अर्जाची शहानिशा करणे.

वरील तीनहि मुद्दांवर दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

अ) अपिलार्थीने या शिक्षण संस्थेच्या विरुध्द शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक, सचिव,शालेय शिक्षण यांच्याकडे केलेल्या तक्रारी अर्जा संदर्भातील सर्व नस्त्या, अपिलार्थी यांनी त्या प्रमाणे लेखी मागणी केल्या नंतर दहा दिवसाच्या आत माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार सर्व जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्याव्यात.

ब) अपिलार्थी यांचे दिनांक- १२-१२-२००६ रोजीच्या अपिलावर प्रथम अपिलिय अधिकारी यांनी तीस दिवसाचे आत निर्णय द्यावा.

क) सचिव, शालेय शिक्षण यांनी त्यांचेकडील प्रतिनिधीस शेख अब्दुल वदूल प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा मालेगाव या शाळेत तपासणीसाठी पाठवून हया संस्थे विरुध्द अपिलार्थी यांनी केलेल्या आरोपाची शहानिशा करावी व त्यात तथ्य आढळून आल्यास संबंधित शिक्षण संस्थे विरुध्द योग्य त्या कायद्यातील तरतुदी नुसार प्रशासकीय कार्यवाही करावी. तसेच सदरची तपासणी अपिलार्थी यांच्या उपस्थितीत करावी.

. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने संदर्भीय शिक्षण संस्थेच्या विरुध्द शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक, सचिव, शालेय शिक्षण यांच्याकडे केलेल्या तक्रारी अर्जा संदर्भातील सर्व नस्त्या,अपिलार्थी

यांनी त्या प्रमाणे लेखी मागणी केल्या सर्व संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी नंतर दहा दिवसाच्या आत अपिलार्थीस पाहणीसाठी माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी नुसार उपलब्ध करुन द्याव्यात.

३. सचिव, शालेय शिक्षण यांनी त्यांचे प्रतिनिधीस शेख अब्दुल वदूल प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा मालेगाव या शाळेत तपासणीसाठी पाठवून हया संस्थे विरुध्द अपिलार्थी यांनी केलेल्या आरोपाची शहानिशा करावी व त्यात तथ्य आढळून आल्यास संबंधित शिक्षण संस्थे विरुध्द योग्य त्या कायद्यातील तरतुदी नुसार प्रशासकीय कार्यवाही करावी. सदरची तपासणी अपिलार्थी यांच्या उपस्थितीत करावी.

औरंगाबाद
दिनांक २० एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

प्रत-

१. श्री.नसीम अहमद, रा.घर नं.४०, सोमवार वॉर्ड, मालेगाव- ४२३२०३.
२. जनमाहिती अधिकारी तथा प्रमूख लिपीक, म.न.पा.शिक्षण मंडळ,मालेगाव यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. जनअपिलिय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ मालेगाव औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई५३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेवून उचित कार्यवाहीसाठी.
५. शिक्षण संचालक, संचालनालय, पुणे यांना वरील अभिप्रायाची नोंद घेवून उचित कार्यवाहीसाठी.
६. शिक्षण उपसंचालक, नाशिक, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेवून उचित कार्यवाहीसाठी.
७. श्री.दौंड सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
८. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/१४२/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक २० एप्रिल २००७

१ श्री.भाऊ शंकरराव सुरडकर : अपीलार्थी
उस्मानपुरा ,जुने पोस्ट ऑफीस शेजारी
औरंगाबाद.

## विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी :
अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक
बांधकाम विभाग, औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक : प्रतिवादी
अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक
बांधकाम भवन औरंगाबाद.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. भाऊ शंकरराव सुरडकर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद श्री.भागवत बाबासाहेब म्हस्के (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद, श्री. पी.अे.तरटे (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक- ०५-०७-२००६ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ३ अन्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"आपल्या विभागा अंतर्गत शाखा अभियंता वेगवेगळया कामाची पहाणी करण्यासाठी कागदोपत्री दाखवितात. व टी.अे.बील (प्रवास खर्च) उचलतात. हया सर्व उचललेल्या बीलाची खालील तक्त्यानुसार माहिती देण्यात यावी."

| शाखा अभियंत्याचे नाव | किती रकम उचलली | कालावधी | कोणत्या कारणासाठी |
|---|---|---|---|

या माहिती बरोबरच अपिलार्थीने मोजमाप पुस्तिकेच्या झेरॉक्सप्रती, टी.अे. बिलाच्या झेरॉक्सप्रती व सदर बिलाची पडताळणी व तपासणी करणा-या अधिका-यांची नावे, ही माहिती विचारली होती.

वरील माहितीचा कालावधी अपिलार्थीने २००५-२००६ हे आर्थिक वर्ष दर्शविले असून ती माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीस नक्की कोणत्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती हव्या आहेत. त्याचा अथवा तद् अनुषंगिक संदर्भाचा त्यांनी उल्लेख केला नाही. याची जाणीव त्यांना सुनावणीमध्ये करुन देण्यात आली.

अपिलार्थीच्या वरील माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी येणारा खर्च म्हणून १,०००/- रुपये जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्या विषयी त्यांचेकडील पत्र क्रमांक- आस्था/ वेतन/ १८९९, दिनांक- १३-०७-२००६ अन्वये सुचविले.

वरील सूचनेप्रमाणे अपिलार्थी यांनी दिनांक- ०७-०८-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे १,०००/- रुपये इतक्या रकमेचा भरणा केला. सदर पावतीचा क्रमांक ८३९४१४९ असा आहे. सदर रकम भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलाथीस दिनांक- ३१-०८-२००६ रोजी माहिती पुरवली.

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीनी प्रथम अपिलिय अधिकारी यांचेंकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक- ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपिल केले. यावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ०३-०१-२००७ रोजी प्रथम सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द झाल्यावरुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, अपूर्ण असलेले सर्व कागदपत्रे अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत देण्यात यावे व अपिलार्थीने भरलेले १,०००/- रुपया पैकी पुरविलेल्या माहितीची रकम वजा करुन शिल्लक रक्कम अपिलार्थीस परत देण्याचे सूचित केले.

यावर जनमाहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीहि कार्यवाही केली नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०२-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. आज झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एकूण १६ कनिष्ठ अभियंते कार्यरत असून त्यापैकी विभागीय कार्यालयामध्ये २ कनिष्ठ अभियंते कार्यरत आहेत. तर ४ कनिष्ठ अभियंत्यानी उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रवासभत्याचे बील केले नाही किंवा कोणत्याही प्रकारच्या आगाऊ रक्कम कार्यालयाकडून घेतली निाही. उर्वरित १० पैकी फक्त ५ कनिष्ठ अभियत्यांच्या संदर्भात जनमाहिती अधिका-यानी अपिलार्थीस माहिती दिली आहे व उर्वरित ५ कर्मचा-यांची माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नसल्याने त्यावेळी ते देवू शकले नाही, असे जनमाहिती अधिकारी सांगत आहेत.

आज सुनावणीमध्ये अपिलार्थी जी माहिती मिळाली नसल्याचे सांगत आहेत. ती उर्वरीत माहिती म्हणजेच राहीलेल्या पाच कनिष्ठ अभियंत्यांच्या टी.ए.बिलाच्या तपशिलाच्या प्रती रजिष्टर पोष्टाने दिनांक ०९-०१-२००७ रोजी अपिलार्थीस पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये पुढे सांगितले व त्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांनी घेतलेल्या पोस्टाच्या पोच प्रतीची झेरॉक्सप्रत दाखविली. अपिलार्थी यांनी सुनावणी मध्ये पोष्टाच्या पोंच पावतीची मूळप्रत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता, जनमाहिती अधिकारी हे पोष्टाच्या पोंच पावतीची मूळप्रत आयोगास दाखवू शकले नाहीत.

या प्रकरणी दोन्हीहि पक्षाचा युक्तीवाद ऐकला असता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत अर्धवट माहिती दिलयाचे सिध्द होते. तसेच अपिलिय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना आदेश देवूनही उर्वरित माहिती देण्यांच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी विलंब लावला व ती माहिती अपिलार्थीस मिळाली आहे किंवा कसे, मिळाली असल्यास त्या बाबतचा ठोस पुरावा आयोगा समोर सादर करु शकले नाहीत. हे सर्व प्रकरण हाताळण्यात या विभागातील प्रशासनामध्ये असलेला ढीसाळपणा व माहिती अधिकार कायदा २००५ बाबत असलेला अनादर स्पष्ट होतो.

वरील वस्तुस्थिती पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपिलिय अधिकारी यांनी आदेश देवून देखील विहीत मुदतीत पूर्ण माहिती न दिल्या बद्दल माहिती अधिकार कायदा कलम २० (२) मधील तरतूदी नुसार त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावे. असे सचिव, सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय, मुंबई यांना आदेशित करण्यात येत आहे. तव्दतच अपिलार्थीस आवश्यक असलेली उर्वरित माहिती जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्या पासून आठ दिवसात पुरवावी. अपिलार्थीने मागितलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती संदर्भात अपिलार्थीस विचारणा केली असता त्यांनी प्रवासभत्ता बीले ज्या मोजमाप पुस्तिकेत आहेत

त्या पुस्तिका असा उल्लेख केला. तेव्हा प्रवासभत्ता बीले मोजमाप पुस्तिकेत लिहित नाहीत व त्याकरिता वेगळे प्रपत्र वापरले जाते. असा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिका-यांनी खुलासा केला. त्यामुळे विशिष्ट क्रमांक दिल्याशिवाय किंवा दुसरा एखादा विशिष्ट संदर्भ दिल्या शिवाय नेमक्या मोजमाप पुस्तिका अर्जदारास उपलब्ध करुन देता येणार नाहीत. हे उघड आहे. तथापि अर्जदाराने तसा एखादा संदर्भ उपलब्ध करुन दिल्यास संदर्भीय मोजमाप पुस्तिकाच्या प्रतिसह ही उर्वरित माहिती अपिलार्थीस आठ दिवसात देण्यात यावी. अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे जमा केलेल्या १,०००/- मधून त्यांना विहित मुदतीत पुरविण्यात आलेल्या माहिती पोटी आलेल्या खर्चाची रकम वजा जाता उर्वरित रकम अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत परत करण्यात यावी, असे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे जमा केलेल्या १,०००/- मधून त्यांना विहित मुदतीत पुरविण्यात आलेल्या माहिती पोटी आलेली रकम वजा जाता उर्वरित रकम अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत परत करण्यात यावी.

३. अपिलार्थीस आवश्यक असलेली उर्वरित माहिती जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्या पासून आठ दिवसात पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द सचिव ( सा.बां.) यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास तीन महिन्याचे आत अनुपालन अहवाल पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक २० एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

प्रत-

१ श्री. भाऊ शंकरराव सुरडकर, जुना उस्मानपूरा, पोस्ट ऑफिस शेजारी, औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता , विशेष प्रकल्प मंडळ, बांधकाम भवन, अदालत रोड, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. सचिव (सा.बां.) यांनी वरील निकाल पत्रात दिलेल्या आदेशाची नोंद घेऊन आयोगास अनुपालन अहवाल पाठविण्यासाठी.

६. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज**

तक्रार क्रमांक ०९/२००७/रामाआ/सीआर

निर्णय दिनांक २१-०४-२००७

श्री. प्रभाकर बाबुराव छत्रपती, एन. ११, के २४/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद : अर्जदार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद :

२ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद : प्रतिवादी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. या प्रकरणाची सुनावणी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १८ (२) अन्वये घेण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळेस अर्जदार स्वतः श्री. प्रभाकर बाबुराव छत्रपती (यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. एस. पी. बामणे, आणि जन अपिलीय

अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. एस. के. येलूरकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने वेळोवेळी केलेल्या अर्जाचे स्वरुप पाहता या प्रकरणा मध्ये चौकशी करणेसाठी वाजवी कारणे आहेत याबाबत राज्य माहिती आयोगाची खात्री झाली असल्याने माहिती अधिकार कायदा कलम १८ (२) प्रमाणे या अर्जाची दखल घेण्यात येत आहे.

या प्रकरणामध्ये अर्जदार हे विजया प्रभाकर छत्रपती सहाय्यक प्रसाविका परिचारिका (ए.एन.एम.) यांचे वडील आहेत. शासनाच्या वित्त विभागाने आश्वसित प्रगती योजने अंतर्गत शासकीय कर्मचारी / अधिकारी यांना १२ वर्षे एकाच वेतन श्रेणीत काम केल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी देण्याबाबत काही वर्षापुर्वी आदेश प्रस्तुत केला होता. या आदेशाच्या तरतुदी प्रमाणे शासकीय कर्मचा-यांना त्यांनी १२ वर्षे एकाच वेतन श्रेणीत सलग काम केल्यानंतर, सेवा विषयक इतर बाबींची पुर्तता करण्याच्या अटीस आधीन राहून, वरिष्ठ वेतन श्रेणी देण्याच्या सूचना शासनाने सर्व खात्यांना दिल्या होत्या. या सुचना जिल्हा परिषदेसही लागू होतात तथापि अर्जदार यांच्या कन्या विजया छत्रपती हिला सदर पदाची वरिष्ठ वेतन श्रेणी न मिळाल्यामुळे अर्जदार सदर कर्मचा-यास ही वरिष्छ वेतन श्रेणी मिळवून देण्याच्या प्रयत्नात आहे. या प्रकरणी त्यांनी वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ तालुका पैठण यांच्याकडे दोनदा व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे याविषया संदर्भात अर्ज केले होते. अर्जदाराला अपेक्षित असलेले वरिष्ठ श्रेणीतील वेतन व तदअनुषंगाने मिळणारा वेतनातील फरक आजतागायतही अर्जदारास मुलीस मिळालेला नाही म्हणून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ रोजी काही माहिती साठी प्रथम अर्ज केला होता. या

माहितीमध्ये शासनाच्या आदेशावर अद्यापपर्यंत कारवाई का होऊ शकली नाही, त्याची कारणे, देयक मुदतबाह्य झाल्यास त्याला जबाबदार कोण, देय रक्कम उशीरा मिळाल्यामुळे आपल्या कार्यालयाकडून व्याज का वसूल करु नये याची कारणे व त्याच बरोबर वेतन अंतीमतः कधी मंजूर होईल याबातची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिका-याकडे मागितली होती. सदर तक्रारी अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे आज सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे.

अर्जदाराने वरील प्रमाणे जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०९-११-२००६ रोजी (सदर अर्ज जन अपीलीय अधिकारी यांचेकडे ०१-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते) एक अर्ज केला होता. सदर अर्जामध्ये त्यांनी संबंधित आरोग्य केंद्रातील लिपीक, वैद्यकीय अधिकारी किंवा गट विकास अधिकारी पंचायत समिती यापैकी कोणामुळे ही देयके थकीत राहिली याची चौकशी करण्यासंबंधी विनंती केली आहे. ही देयके त्यांना कधी प्राप्त होतील याचीही माहिती देण्याविषयी विनंती केली आहे. या अर्जास त्यांनी दहा रुपयाचे कोर्ट फीस तिकिट चिटकविलेले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधित कर्मचा-यास वरिष्ठ वेतन श्रेणी देण्याचे आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालया कडून पारीत झाले आहेत तथापि त्या पृष्ठ्यर्थ त्यांना तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांना, कोणतीही कागदपत्रे आयोगासमोर सादर करता आली नाहीत. तथापि सदर आदेश प्राप्त झाल्या नंतर संबंधित कर्मचा-याचे देयकाचे बील तयार करुन गट विकास अधिकारी पैठण यांच्याकडे दिनांक १३-०४-२००७ रोजी पाठविले आहे असेही पुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. गट विकास अधिकारी पंचायत समिती पैठण यांच्याकडे या बिलाची छाननी

झाल्यानंतर वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ यांच्या नावाने धनादेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित कर्मचा-यास संदर्भिय फरकाची रक्कम तात्काळ अदा करण्यात येईल असे त्यांनी आज सुनावणीमध्ये पुढे कबूल केले.

कालबध्द वेतनश्रेणी संदर्भात शासनाने काही वर्षापुर्वी आदेश दिले असून अद्यापही याची शतप्रतिशत अंमलबजावणी, अशा प्रकारच्या अधिकारी व कर्मचा-यांमुळे होत नाही व परिणामी खात्यावर / शासनावर अकार्यक्षमतेचा ठपका जन सामान्यमार्फत ठेवला जातो.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे वेळी कोणतीही कागदपत्रे आयोगाला सादर केली नाहीत ही बाब त्यांचा, त्यांचे सहका-याविषयीचा दृष्टीकोन स्पष्ट करते व ही येथे विशेष नमूद करण्यासारखी बाब आहे. त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनी अर्जदारास दिनांक २०-१२-२००६ रोजी पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता अर्जदाराची मागणी कशी पूर्ण करता येईल याकडे त्यांनी लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. सदर कर्मचा-या सारखे अनेक कर्मचारी शासनाच्या या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी या प्रकरणाची चौकशी करुन आपला चौकशी अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत राज्य माहिती आयोगास सादर करावा व गट विकास अधिकारी पंचायत समिती पैठण यांनी, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या संदर्भिय देयकाची तपासणी करुन हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत संबंधित वैद्यकीय अधिका-याला धनादेश पाठवावा असे आदेशित करण्यात येत आहे. तव्दतच संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी संबंधित कर्मचा-याला त्याला देय असलेली रक्कम सदर धनादेश प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत अदा करावी असेही पुढे आदेशित करण्यात येत आहे. त्याच बरोबर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांच्या

कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत असणा-या सर्व कर्मचा-यासंदर्भात सहानुभुतीचा दृष्टीकोन ठेऊन त्यांच्या खात्यातील इतर सर्व कर्मचा-याला या योजनेचा लाभ झाला आहे किंवा कसे याबाबत आढावा घ्यावा व त्याचा तपशील आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. या प्रकरणी अक्षम्य दिरंगाई केल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे व याची नोंद त्यांच्या वरिष्ठांनी घ्यावी.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी पंचायत समिती पैठण यांनी वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या संदर्भिय देयकाची तपासणी करुन हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत संबंधित वैद्यकीय अधिका-याला धनादेश पाठवावा. तव्दतच संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी संबंधित कर्मचा-याला त्याला देय असलेली रक्कम सदर धनादेश प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत अदा करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर बाबुराव छत्रपती, एन. ११, के २४/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ

तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

४ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांना योग्य ती नोंद घेण्याबाबत.

५ गट विकास अधिकारी पंचायत समिती पैठण यांना योग्य ती नोंद घेण्याबाबत.

६ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/९६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २३ एप्रिल, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती.लक्ष्मी नारायण पुरी<br>मु.पो.पांगरी कॅम्प ता.परळी,<br>जिल्हा- बीड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | शाखा प्रमूख (महसूल शाखा)<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>परभणी. | .. | प्रतिवादी |
| २. | जिल्हाधिकारी,परभणी | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्रीमती लक्ष्मी नारायण पुरी (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हया हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा शाख प्रमूख (महसूल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी हे गैरहजर आहेत. जन अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी श्री.गावंडे व्ही.एन ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दिनांक- १५-१२-२००६ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांनाच जनमाहिती अधिकारी संबोधून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“२२-११-२००६ नंतर आलेल्या नोटींगप्रती वारसाफेर करणे बाबत.

६१ आर जमिनीचा वारसांच्या नावे फेरफार मंजूर करणे बाबत.”

अपिलार्थी हे दारिद्री रेषेखाली असल्याचे त्यांना सदर अर्जात नमूद केले असून ही माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षीली होती.

तद्नंतर अपिलार्थीने परत दिनांक- १८-०१-२००७ जिल्हाधिकारी, परभणी यांच्या नावाने माहिती मिळविण्यासाठी परत एक अर्ज करुन त्यामध्ये दिनांक- २२-११-२००६ नंतर झालेल्या नऊ पानी नोटींगच्या प्रती मिळण्या बाबत व वारसा फेरफार मंजूर करण्या बाबत अशा प्रकारची माहिती मागविली आहे.

अपिलार्थीच्या वरील अर्जावरुन अपिलार्थीस निश्चीतपणे कोणत्या सर्वे नंबरच्या जमिनीचा तपशील हवा आहे व निश्चीतपणे काय हवे आहे. याचा अर्थबोध होत नाही.

तद्नंतर अपिलार्थीने माहिती अधिकार कायद्यातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे अपिल न करता आयोगाकडे सरळ (दिनांक-२२-०१-२००७) रोजीचे अपिल दिनांक- ०५-०२-२००७ रोजी दाखल केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीस हवी असलेली माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातून मूळ अर्ज त्यांच्याकडे परत पाठवून महसूल शाखेने अपिलार्थीचा अवमान केला आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व त्याबद्दल संबंधितास योग्य ती शास्ती लावावी, असे त्यांनी आयोगाकडे दुसरा अर्ज केला आहे त्यात म्हटले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक- २००७, दिनांक- २३-०३-२००७ अन्वये त्यांचे म्हणणे आयोगा समोर सादर केले आहे.

सदरच्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीने अर्जा सोबत दारीद्र रेषे खाली असल्या बाबत दर्शविणारा पुरावा म्हणजे शिधापत्रिका त्यासोबत जोडली नसल्यामूळे सदर मूळ अर्ज दिनांक- २९-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविला, असे म्हटले आहे, त्याच बरोबर अर्जदारास प्रथम अपिलाचा पर्याय उपलब्ध असतांना तो न वापरता आयोगाकडे सरळ व्दितीय अपिल केले असल्याने अपिलार्थीचे अपिल टेनेबल नाही म्हणुन निकाली काढावे अशी आयोगांस विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या संदर्भीय अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस जिल्हाधिकारी कार्यालय परभणी चे पत्र दिनांक- ०९-०२-२००७ अन्वये तहसीलदार परळीवैजनाथ, जिल्हा-बीड यांच्या मार्फत आवश्यक ती माहिती पोष्टाने पाठविली . तथापि तहसीलदार परळीवैजनाथ, जिल्हा बीड यांनी त्यांचे पत्र दिनांक-०५-०३-२००७ अन्वये सदर अर्जदार हे दिलेल्या पत्यावर राहात नसून पाठविलेली कागदपत्रे परत पाठविण्यात येत आहेत असे कळवून हे पत्र जिल्हाधिकारी परभणी यांना परत पाठविले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात स्वतःचा पत्ता हेतूपूरस्सर बरोबर नमूद केला नाही, असे जिल्हाधिकारी, परभणी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीस प्रथम माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसीलदार परळीवैजनाथ यांच्या मार्फत दिनांक- ०९-०२-२००७ रोजी पाठविली होती. तथापि अपिलार्थी यांचा पत्ता दिलेल्या ठिकाणी अपिलार्थी हे राहत नसल्याच्या कारणावरुन सदर माहिती तहसीलदार परळी वैजनाथ यांनी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे परत पाठविली व अंतिमतः दिनांक- ०८-०३-२००७ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांनी स्वतः अपिलार्थीस ही माहिती दिल्याचे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

या प्रकरणी तहसीलदार परळी वैजनाथ यांनी तपासणी न करता कार्यालयामध्ये बसून संबंधित तलाठी यांच्या संगनमताने अपिलार्थी हे दिलेल्या पत्यावर राहत  नाहीत, असे खोटे कळवून ही माहिती अपिलार्थी यांना मिळाली आहे किंवा नाही याबाबत प्रयत्न केला नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तेंव्हा या प्रकरणी महसूल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी तलाठी परळी वैजनाथ व तहसीलदार परळीवैजनाथ यांची या प्रकरणातील तक्रारी बाबत चौकशी करुन यथायोग्य कार्यवाही करावी.

अपिलार्थीने प्रथम अपिल  प्रथम अपिलिय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे न करता सरळ दुसरे अपिल राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-०५-०२-२००७ रोजी केले आहे.  आता अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली सर्व माहिती दिनांक- ०८-०३-२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामूळे तसेच सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर सुनावणीमध्ये कबूल केल्यामुळे अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे. त्याच बरोबर जिल्हाधिकारी परभणी यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सर्व संबंधित जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदा २००५ मधील  तरतुदी प्रमाणे कोणत्याही नागरीकाचा माहिती मागविण्याचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर, कायद्यामध्ये विहित केलेल्या मुदतीत, अपिलार्थीस माहिती देऊन  त्यावर या

कायद्याची उद्दिष्ठे लक्षांत घेऊन सकारात्मक कार्यवाही करावी, अशा प्रकारच्या सूचना द्याव्यात. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २३ एप्रिल,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्रीमती.लक्ष्मी नारायण पुरी मु.पो.पांगरी, कॅम्प- परळीवैजनाथ जि.बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा शाखा प्रमूख (महसूल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६. श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई — ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७. निर्णय नस्ती.